मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 · वर्ष २५ · अंक २१५ · सातारा · शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४ · पाने ८ (सुप्रभात) · किंमत ५/- रूपये

## अभिनेते सयाजी शिंदे यांच्यावर साताऱ्यात 'अँजिओप्लास्टी'



**सातारा :** मराठीसह हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदेंच्या प्रकृतीबाबत मोठी माहिती समोर आली आहे. ११ एप्रिल (गुरुवार) रोजी त्यांच्यावर साताऱ्यात हृदय शस्त्रक्रिया पार पडली आहे. छातीत त्रास जाणवू लागल्यानंतर साताऱ्यातील एका खाजगी रुग्णालयात त्यांना (पान ३ वर)

# सांगलीत विशाल पाटलांची बंडखोरी अटळ?

## समर्थकांनी पहिल्याच दिवशी घेतले दोन अर्ज



**सांगली : अखेर सांगलीमध्ये काँग्रेसने बंडखोरी केली आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. काँग्रेस नेते विशाल पाटील यांच्या स्वीय सहायकाने विशाल पाटील यांच्यासाठी शुक्रवारी (१२ एप्रिल) उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी कार्यालतील निवडणूक कार्यालयातून घेतला आहे. त्यामुळे काँग्रेसकडे वारंवार उमेदवारी मागणारे विशाल पाटील बंडखोरीच्या भूमिकेत असल्याचे चित्र आहे. विशाल पाटील सोमवारी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. असे असले तरी काँग्रेसकडून तिकीट मागण्यावर देखील विशाल पाटील अद्याप ठाम आहेत. काँग्रेसने सांगलीत उमेदवारी न दिल्यास विशाल पाटील यांचे सर्व समर्थक राजीनामे देणार आहेत.**

विशाल पाटील यांच्या स्वीस सहाय्यकाने उमेदवारी अर्ज घेतल्याने विशाल पाटील यांची बंडखोरी निश्चित झाली आहे. वसंतदादा आघाडी नावाने विशाल पाटील हे आघाडी देखील स्थापन करणार असून त्यांच्या नावाने देखील स्वतंत्र उमेदवारी अर्ज भरण्यात येणार असल्याचे देखील पाटील यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात येत आहे.

दुसरीकडे, सांगली लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आजपासून प्रक्रिया सुरु झाली आहे. १९ एप्रिल अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. भाजप उमेदवार संजय पाटील १८ एप्रिलला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार पैलवान चंद्रहार पाटील दुसऱ्या दिवशी १९ एप्रिलला अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत व शरदचंद्र पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह काँग्रेस नेते उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेची सांगलीच्या राजकीय आखाड्यात प्रवेश झाला आहे. शेट्टी यांच्याकडून जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. २०१९ मध्ये आघाडीच्या जागावाटपात सांगलीची जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडे आली होती. त्यावेळी काँग्रेसचे विशाल पाटील यांनी स्वाभिमानीच्या चिन्हावर निवडणूक लढवली होती. मात्र, वंचित बहुजन आघाडीच्या गोपीचंद पडळकर यांच्यामुळे ही निवडणूक तिरंगी झाल्याने विशाल पाटील यांना पराभव स्वीकारावा लागला होता. दुसरीकडे, महाविकास आघाडीने जागावाटप जाहीर केलं असलं तरी सांगलीबाबत पुनर्विचार व्हावा, अशी काँग्रेस नेते आणि आमदार विश्वजीत कदम यांची मागणी आहे.

# एका बाजूला राजा, दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता

## शरद पवारांनी साताराचे गणित मांडले...



**मुंबई :** साताऱ्याची जागा आमच्या अध्यक्षांनी जाहीर केली. साताऱ्याचा उमेदवार आम्ही जाहीर केला आहे. माथाडी कामगारांसाठी काम करणाऱ्या शशिकांत शिंदे यांना पक्षाने संधी संधी दिली आहे. एका बाजूला राजा आणि दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य कुटुंबातील सामान्य कार्यकर्ता, अशा प्रकारची लढत साताऱ्यात होणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार म्हणाले. शरद पवारांनी बारामतीतील माळेगाव येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले, अकलूजमधून अनेक सहकारी भेटायला आले. त्यामध्ये धैर्यशील यांचे नाव पुढे आलं. पक्षाचे अध्यक्ष अकलूजमध्ये त्यांना प्रवेश देतील. पक्षप्रवेश झाल्यानंतर धैर्यशील मोहिते यांची उमेदवारी जाहीर होईल. या सबंध मतदारसंघामध्ये तरुणांचा पाठिंबा दिसतोय. आम्ही लवकरच पक्षात च्या उमेदवाराचं नाव जाहीर करू, असंही शरद पवारांनी सांगितलं.

नामदेव ताकवणे यांनी आमच्या सोबत काम करण्याचा निर्णय घेतला, त्याचा आम्हाला आनंद आहे. भाजपचे अध्यक्ष हे आमच्या पक्षात येऊन सर्वसामान्य लोकांसाठी काम करण्यास तयार आहेत. भीमा पाटस सहकारी साखर कारखाना आहे, तिथे नवव्यवस्थापन आहे. नवीन लोक जे येतात त्यांचे स्वागत त्या साखर कारखान्याच्या राजकारणात अधिक लक्ष देण्याची भूमिका आमची नाही. हा कारखाना चालला पाहिजे शेतकऱ्यांचा फायदा झाला पाहिजे, असंही शरद पवारांनी नमूद केलं.

चंद्रराव तावरे आणि मी एकाच शाळेत शिकलो. सुप्रियाच्या लग्नात अनेक पाहुणे आले होते. त्या पाहुण्यांची सोय करायला जे आमचे सहकारी पुढे होते. त्यामध्ये चंद्रराव तावरे यांचे नाव येतं. कालांतराने त्यांनी वेगळी भूमिका घेतली, असं शरद पवार चंद्रराव तावरे यांची भेट घेतल्यानंतर म्हणाले. काकडे कुटुंबियांच्या भेटीवरही शरद पवारांनी भाष्य केलं. शरद पवार म्हणाले, त्या कुटुंबात एक दु:खद घटना घडली म्हणून मी गेलो होतो. बाबा काकडे गेल्यानंतर मी त्यांच्या घरी गेलो होतो. हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. एखादं कर्तुत्ववान व्यक्ती गेल्यानंतर त्या कुटुंबांचे सांत्वन करणे ही आमची जबाबदारी आहे.

विवाहविषयक संकेतस्थळावर झालेली ओळख

# तरुणीला पडली ४० लाख रूपयांना...

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** विवाहविषयक संकेतस्थळावर झालेली ओळख तरुणीला ४० लाख रुपयांना पडली. पुण्यातील संगणक अभियंता तरुणीची सायबर चोरट्यांकडून फसवणूक झाली आहे. विवाहाचे आमिष दाखवून तरुणीकडून तब्बल ४० लाख रुपये लुटले. याप्रकरणी या तरुणीने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या तरुणीने एका विवाहविषयक संकेतस्थळावर नाव नोंदणी केली होती. यावेळी संकेतस्थळावर तिची ओळख राजेश शर्मा या व्यक्तीशी झाली. मी परदेशात एका मोठ्या कंपनीत अधिकारी आहे, असं या शर्मा नावाच्या व्यक्तीने तिला बतावणी केली. शर्माने विवाहास होकार दिल्यानंतर त्या दोघांमध्ये संपर्क वाढला.

त्याने लवकरच भारतात येऊन एक व्यवसाय सुरू करणार असल्याचे तरुणीला सांगितले. यासह त्याने एक बनावट विमान प्रवासाचे तिकिट तिला पाठविले. मी दिल्ली विमानतळावर आलोय पण परदेशी चलनाबाबत माझी चौकशी करण्यात येत असल्याचे त्याने या तरुणीला फोन करून सांगितलं. काही शुल्क या ठिकाणी असलेल्यांना द्यावा लागेल असे सांगून त्याने तरुणीला बँक खात्यात त्वरित पैसे जमा कर असं सांगितलं. त्याच्या बोलण्यावर (पान ३ वर)

## वर्षा गायकवाड दिल्लीत जाण्यावर ठाम!



**मुंबई :** काँग्रेसच्या माजी मंत्री वर्षा गायकवाड यांनी महाविकास आघाडीच काम सुरू असले तरी पण आमचे काही प्रश्न आहेत, असे म्हटले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने जागावाटप केलं. पण या जागावाटपानंतर काँग्रेसमध्ये धुसफूस वाढली आहे. काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री वर्षा गायकवाड यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपावर स्पष्ट नाराजी व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी या नाराजीबाबत थेट दिल्ली गाठण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेणार आहेत.

# उमेदवारी अर्ज नेण्यास सुरूवात; पोलिसांचा कडक बंदोबस्त



**राजदंड / सोलापूर**

सोलापूर आणि माढा लोकसभा मतदार संघासाठी निवडणूक प्रक्रिया शुक्रवारपासून सुरु झाली असून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यावेळी अनेकांनी नामनिर्देश अर्ज नेतानाची गर्दी दिसून आली.

सोलापूर आणि माढा येथील लोकसभा निवडणूक २०२४ साठी निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून, शुक्रवार दि. १२ एप्रिल ते १९ एप्रिलपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार असून, २२ एप्रिल २०२४ रोजी अर्ज मागे घेण्याची तारीख आहे. ७ मे रोजी मतदान तर ४ जूनला मंतमोजणी होणार आहे. सोलापूर आणि माढा लोकसभा मतदार संघासाठी निवडणूक प्रक्रिया शुक्रवार पासून सुरु झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना राजकीय पक्षाच्या उमेदवारांसोबत किमान५ जणांना प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी येताना कार्यालय पसिरात तीन वाहने आणता येतील. जिल्हाधिकारी सातरस्ता शासकीय दूध डेअरी येथील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील १०० मीटर अंतर सर्वसामान्यांना रहदारीसाठी निर्बंध असणार आहेत.

जिल्हा प्रशासनाची पूर्ण तयारी झाली आसून सोलापूर लोकसभा मतदार संघासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तर माढा मतदार संघासाठी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका ठाकूर हे निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास १९ एप्रिल शेवटची तारीख असून या दिवशी गर्दी होण्याची शक्यता आहे. तर २२ एप्रिल रोजी अर्ज मागे घेण्याचा दिवस आहे. या दोन्ही मतदारसंघासाठी सात मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात मतदानासाठी एकूण ३ हजार ६१७ मतदान केंद्रे आहेत. तसेच ३ हजार ५९९ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आहेत. जिल्ह्यामध्ये एकूण २७ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. युवा मतदारांचा टक्का वाढला आहे जिल्ह्यात एकूण ११ विधानसभा मतदार संघ आहेत, त्यात एकूण पुरुष मतदार १८ लाख ७६ हजार ४९८, स्त्री मतदार १७ लाख ५० हजार २९७ व इतर मतदार २८० असे एकूण ३६ लाख २७ हजार ७५ एवढे मतदार व ४ हजार ५१९ सैनिक मतदार आहेत. यामध्ये १८-१९ वयोगटातील मतदारांची संख्या जवळपास ५२ हजार ७८३ असून २०-२१ वयोगटातील मतदार हे ७ लाख १२ हजार १४७ इतके आहेत. पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या नेतृत्वाखाली १०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सोलापूरसाठी तीन पोलीस निरीक्षक, सहा पोलीस उपनिरीक्षक, ४४ पुरुष कर्मचारी, १० महिला कर्मचारी आणि आरसीबीचे (पान ३ वर)

# खून प्रकरणातील फरारी आरोपी जेरबंद

## सातारा शहर पोलिसांची दमदार कारवाई



**राजदंड / सातारा**

साडेपाच महिन्यापासून गोडोली नाका येथेएकाचा खून करून फरार असणाऱ्या आरोपीला सातारा शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने बिहार राज्यातील गया येथून अटक केली आहे . छोटू उर्फ नरेंद्र रामदिन चौधरी उर्फ पटेल, वय २२ राहणार सिद्धांत नगर गया असे आरोपीचे नाव आहे या आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

३१ ऑक्टोबर २०२३ रोजी किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणांमध्ये गोडोली येथे बालाजी सोमनाथ रेड्डी, वय २७, राहणार करंजे रोड, म्हसवे याचा धारदार शस्त्राने खून झाला होता . मयताचा भाऊ मनीष रेड्डी याने सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती मात्र या प्रकरणातील संशयित बिहार मधून नेपाळ देशामध्ये पळून गेल्याने तो आढळून येत नव्हता . सातारा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने कौशल्यपूर्ण तपास सुरू ठेवला होता गुन्हे प्रकटीकरण शाखेचे एक पथक अधिक तपासासाठी गया बिहार येथे रवाना झाले.

गया येथे अनेक संशयतांची कसून चौकशी करण्यात आली मात्र त्यांची (पान ३ वर)

# प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**राजदंड / भोर**

प्रकल्पग्रस्त दाखला मिळविण्यासाठी कुटुंबाच्या वंशावळीचे अपूर्ण व दिशाभूल करणारे प्रतिज्ञापत्र देऊन शासनाची दिशाभूल करणाऱ्या व्यक्तीवर भोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषिकेश संतोष दानवले(रा. बारे बु., ता. भोर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव असून याबाबत भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे व तहसीलदार सचिन पाटील यांच्या आदेशानुसार मंडलअधिकारी सुनील नारायण धर्मकांबळे यांनी भोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ऋषीकेश संतोष दानवले(रा. बारे बु., ता. भोर) यांनी भोर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे १ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रकल्पग्रस्त दाखला मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जासोबत त्यांनी दिलेल्या दोन्ही प्रतिज्ञापत्रामध्ये मयत महादु बाळु दानवले यांच्या वारसांच्या वंशावळी ची माहीती देऊन प्रकल्पग्रस्त दाखला प्राप्त करून घेतला होता. परंतु मयत महादु दानवले यांच्या वारसांची वंशावळ ही अपूर्ण व दिशाभुल करणारी असल्याचा तक्रारी अर्ज रामदास उत्तम (पान ३ वर)

# रेल्वे स्टेशन मास्तरचे घर भरदिवसा फोडले

## सांगोल्यातील घटना; सव्वा लाखांचे दागिने लांबविले

**राजदंड / सोलापूर**

दरवाजा बंद करून दूध आणायला बाहेर पडल्याची संधी साधत चोरट्यांनी रेल्वे स्टेशन मास्तराचे घर फोडून कपाटातील ३.५ तोळे सोन्याच्या दागिन्यांसह चांदीचे पैजण असे १ लाख ३८ हजारांचे दागिने चोरून लंपास केले. ही घटना गुरुवार, ११ रोजी सकाळी ११.१५ च्या सुमारास सांगोला येथे वासूद रोडवर कर्मवीर नगर येथे घडली. याबाबत, स्टेशनमास्तर गंगाकुमार मंगल सिंह (रा.सांगोला) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी गंगाकुमार हे सांगोला रेल्वे स्टेशन येथे स्टेशन मास्तर म्हणून नोकरी करतात. दरम्यान ८ एप्रिल रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास सांगोला येथून ते स्वतः पत्नी, मुलगा व मुलगी यांना घेऊन सोलापूर येथे आले होते. ९ एप्रिल रोजी मुलीची परीक्षा असल्याने ते सोलापुरात आले होते. पत्नी व मुले सोलापूर येथील त्यांच्या मित्राकडे थांबले होते. गुरुवारी सकाळी ११ वाजता घरी आले व दूध आणण्यासाठी दरवाज्याला कडी लावून बाहेर गेले. हीच संधी साधून चोरट्यांनी त्यांच्या घरात शिरून बेडरूमच्या खोलीतील कपाटाचा दरवाजा उघडला. आतील ड्रावर उचकटून दीड तोळे सोन्याचे मंगळसूत्र, एक तोळे सोन्याची चैन, एक तोळे सोन्याचे कानातील फुले आणि १० भार चांदीचे पायातील पैंजण असे सोन्या चांदीचे दागिने घेऊन तेथून चोरट्यांनी पोबारा केला.

थोड्या वेळाने गंगा कुमार सिंह घरी परतले तेव्हा त्यांना दरवाज्याला लावलेली कडी व दरवाजा उघडा दिसला. घरात जाऊन पाहिले असता बेडरूम मधील लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला. या प्रकरणी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक तपास करत असून भरदिवसा घडलेल्या या चोरीमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.

# मोहिते-पाटलांचं ठरलं; उद्या करणार शरद पवार गटात प्रवेश

## ▪ १६ एप्रिलला माढ्यातून उमेदवारी अर्ज दाखल करणार

**राजदंड / अकलूज**

माढा लोकसभा मतदारसंघात भाजपने उमेदवारी डावललेल नाराज धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवारांची भेट घेतली असून त्यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातला प्रवेश निश्चित झाला आहे. येत्या १४ एप्रिल रोजी त्यांचा पक्षप्रवेश होणार असून १६ एप्रिलला ते माढ्यातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

भाजपने रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी दिल्यानंतर धैर्यशील मोहिते पाटील नाराज होते. त्यामुळे आता भाजपचे रणजितसिंह निंबाळकर विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील अशी लढत होणार आहे. शरद पवार आणि मोहिते पाटील कुटुंबाचे संबंध जुने आहेत. त्यामुळे त्यांची भेट घेतली असे सांगत माढ्याबाबत 'वेट अँड वॉच' अशी प्रतिक्रिया मोहिते पाटील यांनी दिली.

धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पक्षप्रवेशाच्या आधी शरद पवार यांच्या उपस्थितीत अकलूज येथे एक मेळावा घेण्यात येणा आहे. त्यानंतर १६ एप्रिल रोजी सोलापूरच्या काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्यासोबत ते अर्ज दाखल करणार आहेत.

### सोशल मीडियावर सक्रीय

**धैर्यशील मोहिते-पाटील एक उच्चशिक्षित राजकारणी आणि उद्योजक आहेत. त्यामुळे सोशल मीडियाचे महत्त्व ओळखून आहेत. ते सातत्याने आपल्या कामाची प्रसिद्धी सोशल मीडियावर करत असतात. गावभेटी, कार्यकर्त्यांची केलेली कामे, मतदारसंघातील प्रश्न आणि ते सोडवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती ते अपलोड करत असतात.**



मोहिते पाटील घराण्यातून बंडखोरी होणार असून शरद पवारांच्या उपस्थितीत धैर्यशील मोहिते पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. रणजितसिंह निंबाळकर यांना पुन्हा एकदा भाजपने संधी दिल्यानंतर त्याला धैर्यशील मोहिते पाटील यांनी विरोध केला होता. भाजपने माढ्यातील उमेदवार बदलावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पण भाजपने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. या दरम्यान मोहिते पाटलांची नाराजी दूर करण्याचा भाजपच्या नेत्यांनी प्रयत्न केले, परतुं त्यांना यश आले नाही.

### रामराजे मोहिते पाटील यांचे काम करणार

**धैर्यशील मोहिते पाटलांचे चुलत बंधू रणजितसिंह मोहिते पाटील हे भाजपचे विधानपरिषदेचे आमदार आहेत. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मोहिते पाटील घराण्यातील बंडखोरी टाळण्यासाठी शर्थी प्रयत्न केले. मात्र तरीही धैर्यशील पाटील यांनी बंडखोरी करायच ठरवलं असून ते माढ्यातून अर्ज भरणार आहेत. रणजित निंबाळकर यांच्या उमेदवारीला महायुतीत असलेल्या रामराजे निंबाळकरांनीही विरोध केला आहे. धैर्यशील मोहिते पाटील आणि रामराजे निंबाळकर कुटुंबीयांच्या भेटीगाठी होत आहेत. या परिस्थितीत महायुतीत असलेले फलटणचे रामराजे नाईक निंबाळकर आणि त्यांचे बंधू काय भूमिका घेता हे देखील महत्वाच ठरणार आहे.**

# सैन्य दलात नोकरी लावण्याच्या आमिषाने १२ लाखांची फसवणूक

**पुणे :** सैन्य दलात नोकरी देण्याच्या आमिषाने एकाला सव्वाबारा लाखांना गंडा घालण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी लष्कर पोलिसांनी राहुल उर्फ दिगंबर हिरामण माहिते, मोहित पवनकुमार सेवक, राजकुमार सारसार या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तेरुनिसा बाबु शेख (वय ६०, रा. पाटील इस्टेट शिवाजीनगर) यांनी तक्रार दिली आहे. हा प्रकार २०२० ते २०२१ यादरम्यान घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार शेख यांचा नातु बिलाल याला आर्मीत नोकरी लावतो असे तिघांनी सांगत विश्वास संपादन केला. तसेच बिलाल याच्यावर असलेली फौजदारी केस निकाली काढू असे खोटे आश्वासन दिले. तसेच, त्यांच्याकडून वेळोवेळी १२ लाख ३१ हजार रुपये उकळले. यानंतरही तक्रारदार यांना नोकरी मिळाली नाही. तसेच, त्यांचे कोणतेही काम होत नसल्याचे लक्षात आले. त्यावेळी शेख यांनी आरोपींकडे पैसे परत मागितले, त्यावेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पुढील तपास सहायक निरीक्षक दांगडे करत आहेत.

# सुवर्ण झळाळी



सोन्या-चांदीचे भाव सध्या विक्रमी पातळीवर आहेत. गुढीपाडवा आणि लग्नसराई यामुळे सोन्याच्या भावात वाढ झाली, हे अनेक कारणांपैकी एक आहे. असे असले, तरी सोन्या-चांदीच्या भाववाढीला तेवढेच एकमेव कारण नाही. भारतीयांची सोन्यातील गुंतवणूक जरी भावनिक असली, तरी आता अनेक लोक सोन्या-चांदीच्या गुंतवणुकीकडे परतावा देणारी गुंतवणूक म्हणून पाहतात. त्यामुळेही सोन्या-चांदीच्या दरात वाढ झाली आहे. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. बँकांनी आता मोठ्या प्रमाणात सोन्याचे साठे करायला सुरुवात केली आहे. जगभरातील अनेक बँकांकडे लाखो कोटी रुपयांचे सोने पडून आहे. बाजारात मागणी जास्त झाल्याने सोन्याला झळाळी आली आहे. सोन्याचे भाव सध्याच करासह ७५ हजार रुपये प्रतितोळा आहेत.

अजून अक्षय तृतीया आणि लग्नसराई असल्याने सोन्याची मागणी वाढणार आहे; परंतु आता सोन्यातून जास्त परतावा मिळण्याच्या आशेने गुंतवणूक करताना जोखीम आहे, याचे भान ठेवावे लागेल. त्याचे कारण सोन्याच्या भाव निश्चितीत अमेरिकेच्या फेडरल बँकेचाही मोठा वाटा असतो. सोन्या-चांदीचे भाव विक्रमी पातळीवर आहेत. सोन्या-चांदीच्या दरात वाढ होत राहील, असा अंदाज प्रत्येकजण व्यक्त करत आहे. काही जण वर्षअखेरीस ७५ हजार रुपयांची पातळी मोजत आहेत. दिवाळीपर्यंत सोन्याचा भाव ७२,५०० रुपयांपर्यंत पोहोचेल, असे काहींचे म्हणणे आहे. सोने स्वस्त होईल असे कोणी म्हणत नाही; परंतु सोन्याच्या भावावर नजर ठेवून असणाऱ्यांचे म्हणणे थोडे वेगळे आहे, ते जाणून घेतले नाही, तर सोन्याच्या गुंतवणुकीतून नफा होण्याऐवजी नुकसानच वाट्याला येऊ शकते. जून महिन्यात सोन्याच्या भावात ६ ते ७ हजार रुपयांची घसरण होऊ शकते असे म्हटले, तर त्याला वेड्यात काढले जाईल; परंतु असे वेडेच आपल्याला सावध करीत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. सोन्याच्या किमती वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे भू-राजकीय तणाव आहे, हे अजून भल्या भल्यांच्या लक्षात आलेले नाही. मध्य पूर्वेत इराण इस्त्रायलच्या विरोधात उभा राहिला आहे. इस्त्राईलने इराणच्या दूतावासातील कर्मचाऱ्यांवर हल्ला केला. त्यात १३ जणांचा मृत्यू झाला. इराण अजून तरी शांत असला, तरी आता ईद पार पडल्याने तो कधीही प्रत्युत्तर देण्याची शक्यता आहे. या संभाव्य युद्धासाठी अमेरिकेलाही सतर्क करण्यात आले आहे. रशिया आणि युक्रेनमधील तणावही कमी झालेला नाही. अशा परिस्थितीत जागतिक बाजारात या युद्धाचे काय परिणाम होतील, हे पाहावे लागेल.

एकीकडे चीनची अर्थव्यवस्था संकटात असताना तिथल्या बँकांनी मात्र सोन्याचा साठा करून ठेवला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेची मध्यवर्ती असलेल्या फेडरल रिझर्व्हकडून संभाव्य व्याजदर कपातीची चर्चा अनेक दिवसांपासून होती. ती आता हवेत विरली आहे. आता सर्वात मोठा प्रश्न असा आहे, की जून महिन्यात सोन्याचे भाव सध्याच्या पातळीपासून ८ ते १० टक्क्यांनी घसरतील म्हणजेच ६ ते ७ हजार रुपयांनी सोने घसरेल, खरेच असे होऊ शकते? अमेरिकेतील रिझर्व्ह फेडरल बँकेची सर्वात महत्त्वाची धोरण बैठक जूनमध्ये होणार आहे. या बैठकीत मध्यवर्ती बँकेच्या भूमिकेनुसार सोन्याचे भाव वाढणार की घसरणार हे ठरणार आहे. जूनच्या बैठकीत अमेरिकेच्या फेडरल बँकेची भूमिका जर वेगळी राहिली, तर जे लोक सोने स्वस्त होण्याची वाट पाहत आहेत, त्यांना मोठा दिलासा मिळेल. येत्या काही दिवसांत अमेरिकेतील महागाईचे आकडे सर्वांसमोर असतील. मागील महागाईचे आकडेही तीन टक्क्यांच्या वर होते. अमेरिकेच्या रिझर्व्ह फेडरल बँकेचे उद्दिष्ट महागाई दोन टक्क्यांवर आणण्याचे आहे. तथापि, गेल्या आठवड्यातील ब्लॉकबस्टर रोजगार आकडेवारीमुळे गुंतवणूकदारांना निश्चितच थोडा दिलासा मिळाला आहे; पण अमेरिकन गुंतवणूकदार आगामी महागाईच्या आकडेवारीबाबत अजिबात आशावादी दिसत नाहीत. त्यामुळे अमेरिकेची फेडरल बँक चालू वर्षात आतापर्यंत व्याजदरात कोणतीही कपात करू शकलेली नाही. गेल्या वर्षी, अमेरिकेच्या रिझर्व्ह फेडरलने तीन टक्के व्याजदर कपातीचे संकेत दिले होते. कॅलेंडर वर्षाचा एक चतुर्थांश कालावधी उलटून गेला आहे; परंतु व्याजदरात कपात केलेली नाही. अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह महागाई दरांवर लक्ष ठेवून आहे आणि व्याजदरात कपात करेल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच तर फेडरल रिझर्व्हच्या जूनच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केवळ अमेरिकन गुंतवणूकदारांचेच नाही, तर भारतासह संपूर्ण जगाचे डोळे जूनमध्ये होणाऱ्या अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या बैठकीकडे लागले आहेत. किंबहुना काही तज्ज्ञांनी तर महागाईचे आकडे जूनपर्यंत खाली येणार नाहीत, असे सांगायला सुरुवात केली आहे. त्यामुळे अमेरिकन फेडरल रिझर्व्हला आपली व्याजदर कपातीची योजना ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलावी लागू शकते. दुसरीकडे, काही तज्ज्ञांचे असेही म्हणणे आहे, की जूनमध्ये २५ बेसिस पॉइंट कपात केल्यानंतर, फेडरल रिझर्व्ह येत्या काही महिन्यांत आपली भूमिका कठोर ठेवू शकते. ज्याचा डॉलर निर्देशांक आणि रोखे उत्पन्नावर विपरीत परिणाम होऊ शकतो. याचा अर्थ व्याजदरात कपात झाली तरी दोन्हीमध्ये वाढ होऊ शकते.

इथून खरा खेळ सोन्यात पाहायला मिळतो. जर अमेरिकन फेडरल रिझर्व्हने जून महिन्यात व्याजदरात कोणताही बदल केला नाही, तर डॉलर निर्देशांक आणि रोखे उत्पन्न वाढेल. त्यानंतर सोन्याच्या दरात आठ ते दहा टक्क्यांची घसरण दिसून होऊ शकते. फेडरल रिझर्व्हने जूनमध्ये व्याजदरात २५ बेसिस पॉईंट्सची कपात केली आणि येत्या काही दिवसांसाठी व्याजदरांबाबत आपली भूमिका पुन्हा स्थिरावली, तरी सोन्याच्या किमतीत घट दिसून येईल. व्याजदरात कपातीचा फायदा सोन्याच्या भावाने घेतला असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जूनमध्ये व्याजदरात कपात झाली तरी फारसा परिणाम होणार नाही. जून महिना सोन्यासाठी खूप मनोरंजक असणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जूनच्या बैठकीत सोन्याच्या भावाचे भवितव्य ठरणार आहे.

गेल्या १८० ते २०० दिवसांत सोन्याच्या भावात २७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अशा स्थितीत सोन्यात सुधारणा अपेक्षित आहे; मात्र या दुरूस्तीचा कोणताही घटक अद्याप समोर आलेला नाही. आंतरराष्ट्रीय भू-राजकीय तणावापासून ते चीनची खरेदी आणि फेडकडून होणारी संभाव्य कपात, हे सोन्याच्या भाववाढीला समर्थन देत असल्याचे दिसते. अशा स्थितीत जूनच्या बैठकीत फेडरल रिझर्व्हची भूमिका सोन्याच्या किमती ठरवेल. जूनमध्ये फेडरल रिझर्व्हची दर कपातीची शक्यता ५१.१ टक्क्यांवर आली आहे. याचा अर्थ फेडरल रिझर्व्ह जूनमध्ये व्याजदरात कोणतेही बदल न केल्यास सोन्याच्या किमतीत घसरण होईल. जूनच्या बैठकीत महागाईची आकडेवारी दाखवल्यानंतर फेडरल रिझर्व्ह फेडने दरावरील पॉज बटण पुन्हा दाबले, तर सोन्यामध्ये सुधारणा होण्याचा ट्रिगर दाबला जाईल आणि किंमती ८ ते १० टक्क्यांनी घसरतील. याचा अर्थ सध्याच्या पातळीवरून सोन्याच्या दरात ६ ते ७ हजार रुपयांची घसरण दिसू शकते. म्हणजेच सोन्याचा भाव पुन्हा ६४ ते ६५ हजार रुपयांच्या दरम्यान घसरण्याची शक्यता आहे. देशातील फ्युचर्स मार्केटमध्ये सोन्याचा भाव ७१ हजार ७३९ रुपये प्रति दहा ग्रॅमवर पोहोचला होता, जो सोन्याचा नवा आजीवन उच्चांक आहे. एप्रिल महिन्यात सोन्याच्या दरात सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर चालू वर्षात गुंतवणूकदारांनी सोन्याच्या किमतीत १२ टक्क्यांपर्यंत कमाई केली आहे. बँकांना त्यांच्याकडील सोने बाजारात आणायला भाग पाडले आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हने दर कपातीची घोषणा न केल्यास सोन्याची झळाळी कमी होणार आहे.

## माझं चुकलं पण खरे वारसदार असल्याचं सिद्ध करा

### 'त्या' वक्तव्यानंतर मंडलिकांचं शाहू महाराजांना आव्हान

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसत आहेत. त्यातच कोल्हापूरचे खासदार आणि महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीमंत शाहू महाराज यांच्याबाबत खळबळजनक वक्तव्य केलं होतं. त्यानंतर आता मंडलिक यांनी आपली चूक कबुल करत त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे. मात्र त्यांनी शाहू महाराजांना आव्हान दिले आहे.

काय म्हणाले संजय मंडलिक?

संजय मंडलिक यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीमंत शाहू महाराज यांच्याबाबत खळबळजनक वक्तव्य केल्यानंतर त्यांच्यावर सर्व स्तरावरून टीका झाली. त्यामुळे अखेर त्यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले. मंडलिक म्हणाले की, शाहू महाराजांबाबत बोलताना आपला शब्द चुकला. मात्र शाहू महाराज हेच कोल्हापूरच्या गादीचे खरे वारसदार असल्याचं शाहू महाराजांनी सिद्ध करावं असं आव्हान देखील यावेळी मंडलिक यांनी दिलं आहे.

दरम्यान आत्ताचे महाराज हे खरे वारसदार नाहीत, असं विधान संजय मंडलिक यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यामुळं कोल्हापूरचं राजकीय वातावरण चांगलचं तापलं आहे. महाविकास आघाडीने छत्रपती शाहू महाराजांना कोल्हापूर लोकसभेतून उमेदवारी देऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. मात्र महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांनी आता प्रचारासाठी जोरदार कंबर कसली. ते सातत्याने शाहू महाराज आणि काँग्रेसवर टीका करत आहेत.

अशाच एका प्रचारसभेत बोलतांना संजय मंडलिक यांचा तोल सुटला. मंडलिक म्हणाले, आत्ताचे महाराज कोल्हापूरचे आहेत का? ते खरे वारसदार नाहीत. ते सुध्दा दत्तकच आले आहेत. त्यामुळे तुम्ही, आम्ही आणि कोल्हापूरची जनता हीच खरी वारसदार आहे. माझे वडील सदाशिवराव मंडलिक यांनी खऱ्या अर्थाने पुरोगामी विचार जपल्याचं मंडलिक म्हणाले.

## कोल्हापुरातील अंबाबाई देवीच्या मूर्तीचे संवर्धन, दोन दिवस दर्शन बंद राहणार



**कोल्हापूर :** भारतीय पुरातत्व विभागाच्यावतीने करवीर निवासिनी अंबाबाई देवीच्या मूर्तीचे दोन दिवस संवर्धन करण्यात येणार आहे. त्यामुळे दि.१४ व १५ एप्रिल रोजी देवीचे दर्शन बंद राहणार आहे. भाविकांना दर्शनासाठी पितळी उंबऱ्याच्या बाहेर कलश व उत्सवमूर्ती ठेवण्यात येणार आहे.

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची झीज झाल्याने तातडीने संवर्धन करण्याची गरज असल्याचा निष्कर्ष तज्ञांनी दिला आहे. मूर्ती संवर्धनासंबंधीचा दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर कोल्हापूर यांच्यासमोर सुरू आहे. न्यायालयीन आदेशानंतर पुरातत्त्व खात्याचे निवृत्त अधिकारी आर. एस. त्र्यंबके व विलास मांगीराज यांनी १४ व १५ मार्च रोजी केलेल्या पाहणीचा अहवाल न्यायालयात सादर केला होता.

त्यानुसार भारतीय पुरातत्व विभागाच्या वतीने करवीर निवासिनी देवीच्या मूर्तीचे संवर्धन दि.१४ व १५ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. यादरम्यान भाविकांना देवीच्या मूळ मूर्तीचे दर्शन राहणार असून उत्सवमूर्ती व कलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून, भाविकांनी पितळी उंबऱ्याच्या बाहेरुन कलश व उत्सवमूर्तीचे दर्शन घेऊन, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा देवस्थान व्यवस्थापन समितीचे प्रशासक अमोल येडगे यांनी केले आहे.

## दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकार्यांची चौकशी करून कारवाई करा : सुनिल कुरंदवाडे

**शिरोळ :** शिरोळ तालुका शिरोळ येथे निबंधक कार्यालयामध्ये अनागोंदी प्रकरणाची व खरेदी दस्त प्रकरणाची खरेदी होत नसताना मार्ग काढून अशा अनेक खरेदीपत्र आर्थिक देवाण-घेवाण करुन मोठमोठ्या खरेदी दस्त करून ग्राहकांची लाखो रुपयांची लुटमार करुन त्यांची फसवणूक होत असल्याने याबाबत या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोक जनशक्ती पार्टी किसान सेक्सी जिल्हा पुणे जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शिरोळ तालुका शिरोळ येथील दुय्यम निबंधक अधिकारी व या कार्यालयाकडून शिरोळ तालुक्यातील येणारे खरेदी विक्री दस्त केले जातात. एक एक दस्त खरेदी होत नसतानासुध्दा उदा. गुंठेवारी देवस्थान जमणे आहे. वर्ग दोन जमीनी अशा न खरेदी होणा-या जमीनीची खरेदीसाठी मार्ग या कार्यालयात काढला जातो. व यासाठी लाखानं रुपये घेतले जातात. व सदर खरेदीचा बेकायदेशीर मार्ग काढून खरेदी विक्रीपत्र केले जातात. यासाठी अधिका-यापासून कर्मचा-यापासून रक्कम ठरवून घेतले जाते. असा प्रकार अनेक वर्ष सुरु आहे. येथील अधिकारी व कर्मचारी रोजच्या रोज कामावरुन निघताना दहा हजार पासून एक लाखा पर्यंतची रक्कम ग्राहकाकडून लुटली जाते. अशाप्रकार या कार्यालयात सुरु आहे. जो ज्यादा रक्कम देईल त्याचे लगेच खरेदी दरताला नं. लावाला जातो. तसेच मिळकतीचे मुल्यांकन करुन त्या वर्गकरणे कोर्टकामी एखादया व्यक्तीला जामीन होण्यासाठी तहसीलदार यांच्याकडून ऐपत दाखला घेण्यासाठी मिळकतीचे मुल्यांकन करण्याकरीता तहसील कार्यालयात स्वतः यत्रंणा कार्यालयात करावी. जेणेकरुन मिळकतीचे मुल्यांकन करीता दुयम कार्यालयांला हेलपाटी मारावे लागणारे नाही. मिळकतीचे मुल्यांकन करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने मार्गदर्शन, मार्गदर्शक सुचना जाहिर केले आहेत. या सुचनेनुसार दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी मिळकतीचे मुल्यांकन निश्चित करुन मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसुल करतात.

मिळकतीचे मुल्यांकन केवळ खरेदी विकीच्या काम करीत असल्याची माहिती दुख्यम निबंधक कार्यालयाच्या अधिका-याकडून देतात. एखादया ग्राहकाला आपल्या मिळकतीचे मुल्यांकन हवे असल्यास सात बारा उतारा, झोन दाखला, व शंभर रुपयेचे चलन अर्जासोबत जोडावे लागते. मिळकतीचे सक्षम कागदपत्राची पडताळणी करुन मुल्यांगन केले जाते. सदर मुल्यांकन दाखल्यामध्ये सदर दाखल्याचा उपयोग केवळ खरेदी विक्की दस्तऐवज कामे करण्याचा आहे. इतर कारणासाठी वापर केल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही, अशी टिप्पणी सदर मूल्यांकन दाखल्यामध्ये दुय्यम निबंधक अधिकारी नमूद करतात. यामुळे तहसील कार्यालयाकडून मिळकतीचे मूल्यांकन, दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करून आणा, ही बाब कितपत योग्य आहे. याबाबत उलट सुलट चर्चा आहे.

जर दाखला केवळ खरेदी विक्रीसाठी, देण्याचा अधिकारी दुय्यम निबंधकांना असेल तर अशा दाखल्याचा आधारे, तहसील कार्यालयातून अथवा शासनाच्या अन्य महसूल कार्यालयातून मिळकतीचे रुपांतर वर्ग १ मध्ये करण्यायकरीता, मूल्यांकन दाखला ग्राह्य कसा धरला जातो तसेच लायक दाखल्या कमी देखील मुल्यांकन दाखला, दुय्यम निबंधक कार्यातील ग्राह्य कसा धरला जातो याबाबत मोठे गोड बंगाल असल्याचे बोलले जात आहे. आर्थिक घडामोडी आणि कमी मूल्यांकन शासनाचा महसूल बुडवण्यासाठी (२३) च्या माध्यमातून काही ऐजंट अर्थपूण घडामोडी करुन मूल्यांकन कमी करण्याचे अनेक प्रकरणी शिरोळपासून कोल्हापूर जिल्हयापर्यंत जात आहे. कं. २३ खाली विविध युक्त्या लढवून

## शिरोळ ते पंढरपूर चैत्र वारी पायी दिंडीचे उत्साहात प्रस्थान

### बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकारामचा अखंड जयघोष



**शिरोळ :** प्रतिनिधी: बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, श्री राम कृष्ण हरी, श्री विठ्ठल विठ्ठल.. जय हरी विठ्ठलचा अखंड जयघोष करीत टाळ मृदुगाच्या गजरात शिरोळ नगरीतुन चैत्र वारीसाठी तिर्थक्षेत्र पंढरपुरला वारकऱ्यांच्या पायी दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी शिरोळकरांनी दिंडी मार्गावर सडा रांगोळी घालून व फुलांचा वर्षाव करून स्वागत केले. पंढरपूर येथील चैत्र वारीच्या निमित्ताने गेल्या १० वर्षापासून शिरोळ येथील गुरूप्रसाद इंडस्ट्रीजचे प्रमुख व उद्योगपती ह भ प हणमंत उर्फ दादासाहेब इंगळे व इंगळे कुटूंबियांनी स्वखर्चातून वारकऱ्यांच्या पायी दिंडीचे आयोजन करण्याची परंपरा सुरू केली आहे. यावर्षी सुध्दा या दिंडीसाठी शिरोळ परिसरातील २५० वारकरी सहभगी झाले आहेत.

आज शुक्रवारी सकाळी ९ वाजता दादासाहेब इंगळे यांच्या निवासस्थानी न्यायशास्त्री राजराम महाराज यांच्या व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत विणा पूजन, पालखी पूजन व आरती होवून या दिंडीचे उत्साही व भक्तीमय वातावरणात प्रस्थान झाले. यावेळी येथील श्री हनुमान मंदिर गावडे गल्ली, श्री ब्रह्म मंदिर, श्री दत्त मंदिर, श्री लक्ष्मी मंदिर, चौकातील हनुमान मंदिर, श्रीराम मंदिर, श्री विठ्ठल मंदिर येथे आरती होवून ही पायी दिंडी पंढरपुरकडे मार्गस्थ झाली.पायी दिंडी प्रस्थान समयी शहरातील नागरिकांनी रस्त्यावर सडा मारून,रांगोळी काढून पुष्पवृष्टी करत वारकऱ्यांचे स्वागत केले. मनोभावी पालखीचे पूजन करून या दिंडीला शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आमदार उल्हास पाटील, माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील, शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब देसाई माजी नगरसेवक पंडित काळे बाळासाहेब कोळी यांच्यासह परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर,प्रतिष्ठित नागरिक यांनी पायी दिंडीला शुभेच्छा दिल्या. या पायी दिंडी सोहळ्याचे उद्योगपती ह भ प हणमंत उर्फ दादासाहेब इंगळे, सुनिल इंगळे, अनिल इंगळे, गुरूप्रसाद इंगळे,दिगंबर इंगळे व इंगळे परिवारातील सदस्यांनी उत्कृष्ट आणि नेटके नियोजन केले आहे. तर किरण माने, सर्जेराव माने, विलासराव गावडे, शंकर गावडे, भरत रोडे, तानाजी माने, संग्राम माने,उदय जगदाळे,बाळासाहेब जगदाळे यांचे वारकरी दिंडी सोहळ्यास विशेष सहकार्य लाभत आहे. अखंड हरिनामाचा जयघोष करीत भक्तिमय व उत्साही वातावरणात वारकऱ्यांची ही दिंडी पंढरपूरकडे प्रस्थान झाली.

## प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्यावर भोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**भोर :** प्रकल्पग्रस्त दाखला मिळविण्यासाठी कुटुंबाच्या वंशावळीचे अपूर्ण व दिशाभूल करणारे प्रतिज्ञापत्र देऊन शासनाची दिशाभूल करणाऱ्या व्यक्तीवर भोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषिकेश संतोष दानवले(रा. बारे बु., ता. भोर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव असून याबाबत भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे व तहसीलदार सचिन पाटील यांच्या आदेशानुसार मंडलअधिकारी सुनील नारायण धर्मकांबळे यांनी भोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ऋषीकेश संतोष दानवले(रा. बारे बु., ता. भोर) यांनी भोर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे १ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रकल्पग्रस्त दाखला मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जासोबत त्यांनी दिलेल्या दोन्ही प्रतिज्ञापत्रामध्ये मयत महादु बाळु दानवले यांच्या वारसांच्या वंशावळी ची माहीती देऊन प्रकल्पग्रस्त दाखला प्राप्त करून घेतला होता. परंतु मयत महादु दानवले यांच्या वारसांची वंशावळ ही अपूर्ण व दिशाभुल करणारी असल्याचा तक्रारी अर्ज रामदास उत्तम दानवले(रा. ५१३ श्री कृष्णा सहकारी गृह निर्माण संस्था महाविर नगर, कांदीवली पश्चीम) यांनी भोरचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केला. अर्ज प्राप्त झाल्यानंतर राजेंद्र कचरे यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली ८ जानेवारी २०२३ रोजी स्थानिक चौकशी केली असता मयत महादु बाळा दानवले यांना इतरही वारसदार आहेत हे आढळून आले. ऋषीकेश दानवले यांनी प्रकल्पग्रस्त दाखला मिळविण्याकरीता प्रतिज्ञापत्रामध्ये वंशावळीची अपूर्ण माहीती सादर करून शासनाची दिशाभुल करून फसवणूक केली असल्यामुळे मंडलअधिकारी सुनील धर्मकांबळे यांच्या फिर्यादीवरून भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ४२० नुसार ऋषिकेश दानवले यांच्यावर भोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास भोर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए. एम.चव्हाण करीत आहेत.या कारवाईबद्दल भाटघर धरणग्रस्त व पीडित कुटुंबाने विशेषतः मूळ प्रकल्पग्रस्त मयत महादू बाळा दानवले यांचा ९५ वर्षांचा मुलगा पदु महादू दानवले यांनी भोरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडलअधिकारी तसेच पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच या प्रकरणातील गैरकृत्यात सहभागी असणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्याची त्यांनी मागणी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभिवादनाचा फ्लेक्स फाडल्याने भवानीनगरमध्ये तणाव

- माथेफिरूला पोलिसांकडून अटक
- संतप्त युवकांचा 'रास्ता रोको'



**राजदंड / बारामती**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेला फ्लेक्स एका माथेफिरू व्यक्तिने जाळण्याचा प्रयत्न केल्याने मोठा तणाव निर्माण झाला. या माथेफिरू व्यक्तीला बेदम चोप देऊन तरुणांनी पोलीस दुरुक्षेत्रामध्ये आणून पोलिसांच्या स्वाधीन केले.

या घटनेची तात्काळ दखल घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी संजय राठोड यांनी घटनास्थळी भेट देऊन संतप्त जमावाला शांत करून संबंधित इसमावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान बारामती इंदापूर या पालखी महामार्गावर संतप्त जमावाने रास्ता रोको करून या घटनेचा निषेध करत संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक साळुंखे यांनी केलेल्या आवाहनानंतर दहा मिनिटात रास्ता रोको उरकण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य नंदराज थोरात, सणसर ग्रामपंचायतचे माजी सदस्य मोहन सुरडकर, पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण, राष्ट्रवादीचे विक्रम निंबाळकर, सावता परिषदेचे इंदापूर तालुका अध्यक्ष प्रकाश नेवसे आदींसह इतर पदाधिकाऱ्यांनी जमावाला शांत करत संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान संतप्त जमावाने भवानीनगर बंदची हाक दिली होती, मात्र रमजान ईद चा दिवस असल्याने व्यवसायिकांना याचा फटका बसेल, त्यामुळे आंबेडकरी अनुयायांनी बंद पुकारू नये, असे आवाहन केले.

# मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करा!

## जिल्हाधिकाऱ्यांचे नवमतदारांना आवाहन

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** नवमतदारांनी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात उत्साहाने सहभागी व्हावे आणि प्रथम मतदान करून हा उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्यावतीने आयोजित युवक मेळाव्यात सहभागी युवकांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ.दिवसे यांनी संवाद साधला. यावेळी उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, तहसिलदार राधिका बारटक्के उपस्थित होते.

डॉ.दिवसे म्हणाले, मतदानाद्वारे आपण चांगले प्रतिनिधी निवडूण देवू शकतो. देशाचे भविष्य असलेल्या युवकांनी या प्रक्रियेत सहभाग वाढाविणे गरजचे आहे. नवमतदारांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने वर्षभरात अनेक



उपक्रम राबविले आहे. तरीदेखील जिल्ह्यातील युवकांच्या लोकसंख्येच्या तुलनेत केवळ २५ ते ३० टक्के मतदारांनी मतदार नोंदणी केली आहे.

पुणे, शिरुर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी करून इच्छिणाऱ्या युवकांसाठी १५ एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणी करण्याची संधी आहे. युवकांनी निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ हींीिं://ींशऔ. शलळ.सीं.ळप किंवा वोटर हेल्पलाईन ॲपवर आपल्या जागेवरच मतदार नोंदणी करण्याची सुविधा आहे. मतदार नोंदणीसाठी केवळ रहिवासी आणि वयाचा पुरावा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाने लोकशाही व्यवस्था स्वीकारली. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ओळख आहे. अनेक देशात महिलांना मताधिकारासाठी लढा द्यावा लागला, मात्र भारताने स्वातंत्र्यानंतर संविधानाद्वारे महिलांना मताधिकार प्रदान केला. अशा लोकशाही व्यवस्थेत निवडणुकीला महत्व असताना पुण्यासारख्या शहरी भागात राज्यात होणाऱ्या सरासरी मतदानापेक्षा कमी मतदान होते. लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करणे महत्वाचे आहे, असेही दिवसे म्हणाले.

### वयोवृद्ध मतदारांचा आदर्श समोर ठेवा!

**जिल्हाधिकारी म्हणाले, लोकशाही बळकट करण्यात वयोवृद्ध मतदारांचे मोठे योगदान आहे. जिल्ह्यात ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या मतदारांना द्यावयाच्या सुविधेबाबत त्यांच्याशी संपर्क केला असता मतदान केंद्रावर अभिमानाने मतदान करण्याची इच्छा अधिकांश ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली. त्यांच्या या कर्तव्यभावनेचा आदर्श युवकांनी समोर ठेवावा आणि मतदार नोंदणी तसेच मतदानात सहभाग घ्यावा. महाविद्यालयाच्या विविध उपक्रमातदेखील उत्साहाने सहभागी होऊन नेतृत्वगुण आणि संवादकौशल्य विकसित करावे. समाज माध्यममांचा उपयोग सकारात्मकता निर्माण करण्यासाठी करावा आणि आपल्या सहभागातून समाज आणि देश समृद्ध करावा, असे आवाहन त्यांनी केले.**

# सोलापुरात क्रांतीसूर्यास महाविकास आघाडीचे अभिवादन

## प्रणिती शिंदे यांनी केले फुले यांच्या कार्यास वंदन

**राजदंड / सोलापूर**

सोलापूर शहर काँग्रेस वतीने स्त्री शिक्षणाचे जनक थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने सोलापूर लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी सोलापुरातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



यावेळी बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या की, महात्मा फुले हे एक थोर सामाजिक कार्यकर्ते, थोर विचारवंत, समाजसुधारक आणि लेखक होते. त्यांनी सामाजिक प्रबोधन, जातिव्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्री शिक्षण अशी समाजाला विकासाची दिशा देणारी विधायक कामे केली आहेत.

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाचा उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. स्त्री शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीला वाचा फोडली. तसेच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला, त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे विचारही शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहरात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा गौरव करत शहरात एक पूर्णाकृती पुतळा उभारून फुले यांच्या कार्याला साजेशे असे स्मारक निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला.

यावेळी काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर नलीनी चंदेले, माजी मनोज यलगुलवार, विनोद भोसले, शंकर पाटील, तिरुपती परकीपंडला, पंडित सातपुते, अनंत म्हेत्रे, भीमाशंकर टेकाळे, दिगंबर मेटकरी, गोवर्धन सुंचू, सूर्यकांत शेरखाने, राहुल बोळकोटे, व्ही डी गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**राजदंड / सातारा**

सातारा शहरातील यादोगोपाळ पेठेत गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद शाहूपुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, दि. १० एप्रिल २०२४ रोजी सकाळी पावणेदहा वाजण्याच्या पूर्वी आनंद देविदास कदम रा. यादोगोपाळ पेठ, सातारा यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

या घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार भिंगारदेवे करीत आहेत.

# सातारा शहरात जुगार खेळणाऱ्या दोघांवर शाहूपुरी पोलिसांची कारवाई

**राजदंड / सातारा**

शाहूपुरी पोलिसांनी जुगार प्रकरणी दोघांवर कारवाई केली आहे. दि. १० रोजी संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास सातारा शहरातील समर्थ मंदिर चौकात असलेल्या पत्र्याच्या आडोशास ललित बाळासाहेब रसाळ रा. यादोगोपाळ पेठ, सातारा आणि अमित विष्णू नलावडे रा. मंगळवार पेठ, सातारा हे जुगार घेताना आढळून आले.

पोलिसांनी त्यांच्याकडून ४ हजार १७० रुपये रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

पान १ वरून

## खून प्रकरणातील फरारी आरोपी जेरबंद

ओळख पटत नव्हती. गोपनीय बातमीदारामार्फत सातारा पोलिसांनी नरेंद्र चौधरी यांचा माग शोधून काढला. पोलिसांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली त्यावेळी त्याने रेड्डी याचा आपण धारदार शास्त्राने खून केल्याची कबुली दिली. तब्बल साडेपाच महिने नरेंद्र रामदिन चौधरी हा पोलिसांना गुंगारा देत होता. पोलिसांनी त्याची तेथून गठडी आवळली आणि त्याला साताऱ्यात आणून येथील न्यायालयासमोर हजर केले त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्यावर गुन्हा दाखल

दानवले(रा. ५१३ श्री कृष्णा सहकारी गृह निर्माण संस्था महाविर नगर, कांदीवली पश्चीम) यांनी भोरचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केला. अर्ज प्राप्त झाल्यानंतर राजेंद्र कचरे यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली ८ जानेवारी २०२३ रोजी स्थानिक चौकशी केली असता मयत महादु बाळा दानवले यांना इतरही वारसदार आहेत हे आढळून आले. ऋषीकेश दानवले यांनी प्रकल्पग्रस्त दाखला मिळविण्याकरीता प्रतिज्ञापत्रामध्ये वंशावळीची अपूर्ण माहीती सादर करून शासनाची दिशाभुल करून फसवणूक केली असल्यामुळे मंडलअधिकारी सुनील धर्मकांबळे यांच्या फिर्यादीवरून भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ४२० नुसार ऋषिकेश दानवले यांच्यावर भोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास भोर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए. एम.चव्हाण करीत आहेत.

## उमेदवारी अर्ज नेण्यास सुरूवात;...

एक पथक तैनात राहणार आहे तर माढ्यासाठी दोन पोलीस निरीक्षक पाच पोलीस उपनिरीक्षक ३९ पोलीस कर्मचारी महिला कर्मचारी आणि एक आरसीपी पथक असे तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघासाठी १२ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जाहीर होईल, उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ एप्रिल २०२४ असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख २२ एप्रिल २०२४, मतदानाची तारीख ७ मे २०२४ तर मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली. दरम्यान, अर्ज स्वीकारण्याच्या पहिल्या दिवशी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक इच्छुकांनी नामनिर्देश अर्ज स्वीकारल्याचे दिसून आले. यावेळी पोलीसांनी नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचे दिसून आले.

## तरुणीला पडली ४० लाख रूपयांना...

विश्वास ठेऊन या तरुणीने त्याच्या बँक खात्यात ४० लाख ५० हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर शर्माने त्याचा मोबाइल क्रमांक बंद केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिने पोलीस ठाण्यात धाव घेतली.

## अभिनेते सयाजी शिंदे यांच्यावर साताऱ्यात 'अँजिओप्लास्टी'

दाखल करण्यात आले होते. सयाजी शिंदे रुग्णालयात दाखल केल्यावर डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी व काही चाचण्या केल्या. त्यामध्ये हृदयाच्या एका रक्तवाहिनीत ब्लॉक असल्याचे समजल्यानंतर सयाजी शिंदे यांच्यावर तात्काळ अँजिओप्लास्टी करण्यात आली. सध्या त्यांची प्रकृती व्यवस्थित असून दोन दिवसांत त्यांना डिस्चार्ज दिला जाणार असल्याचं डॉक्टरांनी सांगितले आहे. अभिनेत्यांवर उपचार करणारे डॉ. सोमनाथ साबळे त्यांच्या प्रकृतीबद्दल म्हणाले, हृदयविकाराचा झटका येण्याआधी ते फार जागृत होते. त्यांनी सगळ्या गोष्टी सकात्मकतेने हाताळून वेळीच उपचार केले. आता त्यांची प्रकृती स्थिर असून लवकरच त्यांना घरी सोडण्यात येईल. आता त्यांच्या शरीरातील सगळ्या गोष्टी व रिपोर्ट्स स्टेबल आहेत.''

## संदीप चोरमले यांची भाजपच्या सातारा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**राजदंड / फलटण**



फलटण येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते संदीप दौलतराव चोरमले यांची भारतीय जनता पार्टीच्या सातारा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे, माजी मंत्री बाळा भेगडे, भाजपाचे सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

चोरमले यांच्या पक्षातील संघटनात्मक आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात म्हटले आहे.

# लोकशाही वाचवण्यासाठी रवींद्र धंगेकर यांना विजयी करा : वंदना चव्हाण

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** देशात लोकशाही संपवण्यासाठी सर्व प्रयत्न होत असून भाजपा देशाला हुकूमशाहीकडे नेत आहे. भ्रष्टाचारी लोकांना वाशिंग मशीन मध्ये टाकून स्वच्छ करण्याचा वाव ते आणत आहे, हे सामान्य जनता कदापिही खपवून घेणार नाही. लोकशाही वाचवण्यासाठी व सामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांना संसदेत पाठवण्याचा आवाहन माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यांनी केले. तळागाळातील जनतेने त्यांना पाठींबा दिला असून वकिलांनी देखील पाठींबा देऊन त्यांचा विजय निश्चित केला आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

स्वातंत्र्य लढ्यात वकिलांचे मोठे योगदान होते. आता हे स्वातंत्र्यभाजपा हिरावू पाहत आहे हा त्यांचा डाव कदापिही यशस्वी होणार नाही. जनता भाजपाला घराचा रस्ता दाखवून देणार आहे असेही यावेळी ॲड. वंदना चव्हाण यांनी नमूद केले.

पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी शुक्रवारी शिवाजी नगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील विविध विभागाला भेटी दिल्या. या वेळी वकिलांनी धंगेकर यांना पाठिंबा जाहीर करून लोकशाही जिवंत ठेवणारा उमेदवार आम्ही संसदेत पाठवणार असल्याची ग्वाही वकिलांनी दिली. निवृत्त माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ॲड. अभय छाजेड, माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यावेळी उपस्थित होते.

काँग्रेस लीगल सेल, राष्ट्रवादी लिगल सेल, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने जिल्हा व सत्र न्यायालयात धंगेकर यांचा सत्कार करण्यात आला.

काँग्रेस लीगल सेलचे अध्यक्ष ॲड. राहुल ढाले, ॲड.विभा सिंग, ॲड. राशिदा सय्यद, अंजू डिसूजा, संजय साळवी, अश्विनी गवारे, अलका कडलक, फय्याज शेख, राजेंद्र शिंदे, अमोल नलगे, रवींद्र शिंदे, रेश्मा शिकलगार, मोहन वाडेकर, चंद्रशेखर जाधव, विठ्ठल आरुडे, संतोष जाधव, अजय नवले, हैदर पटेल, नाथा शिंगाडे, सतीश संचेती, सतीश कांबळे यांच्यासह वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रत्येक न्यायालयात जाऊन वकिलांच्या भेटी धंगेकर यांनी घेतल्या. त्यांचे आपुलकीने स्वागत करण्यात येत होते. जनसामान्यांतला नेता आम्ही संसदेत पाठवणार आहोत. सामान्यांचे प्रश्न संसदेत मांडणारा लोकशाही जिवंत ठेवणारा पक्षाचा माणूस आम्ही देणार आहोत त्यामुळे आम्हाला आनंदच आहे, आशा भावना वकिलांनी व्यक्त केल्या. पुणे बार असोसिएशन, दि पूना वकिलांची ग्राहक सहकारी सोसायटी, दि पुणे लॉयर्स सोसायटी, जिल्हा महिला बार असोसिएशन, दिवाणी व फौजदारी न्यायालय, स्थानिक बार असोसिएशन, पूना बार क्लब, महिला वकील क्लबच्या वकील व सदस्यांशी धंगेकर यांनी संवाद साधला. लोकशाही वाचवणारा व आमचा चेहरा आम्हाला मिळाला आहे, विजय तुमचा निश्चित आहे, अशा भावना यावेळी वकिलांनी त्यांच्याशी बोलतांना व्यक केल्या. तसेच समाजामध्ये लोकोपयोगी खासदार धंगेकर यांच्या रुपात आम्ही पाहतो आहे, अशा भावना यावेळी त्यांनी व्यक्त केल्या.

धंगेकर म्हणाले, लोकशाही वाचवण्यासाठी रात्रंदिवस झटणाऱ्या वकिलांची ताकत मला मिळाली आहे. त्यामुळे मला हत्तीचे बळ आले आहे. हीच ताकद मी लोकशाही वाचवण्यासाठी वापरणार आहे. सध्या लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे सामान्य पेक्षा वकिलांना जास्त लढावे लागणार आहे. पुढील पिढीला वाचवण्यासाठी परिवर्तनाचा लढा आपल्याला द्यावा लागणार आहे. नागरिकांचे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी मला तुमची साथ हवी आहे. मी जनसामान्यांतून पुढे आलो आहे मी आलो त्यामुळे त्यांचे प्रश्न मला माहित आहे, ते सोडवण्यासाठी मी २४ तास आपल्याला उपलब्ध आहे. निवृत्त न्यायाधीश बी. जी. कोळसे पाटील म्हणाले, सर्व वकील वर्गांनी लोकशाही वाचवण्यासाठी धंगेकर यांना पाठींबा दिला आहे.


शिवाजी नगर न्यायालयातील सर्व संघटना, असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले व धंगेकर यांना पाठिंबा जाहीर केला.

# मतदानासाठी इतर १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरण्यात येणार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पाच टप्प्यात होणार असून १९, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र



सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र याशिवाय या पुराव्यांमध्ये पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरली जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना माहिती- चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## पुणे शहर काँग्रेस ओ. बी. सी. विभागाच्या अध्यक्षपदी प्रदीप मतंवा परदेशी हेच कायम राहतील : अरविंद शिंदे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओ.बी.सी. विभागाकडून पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीला अद्याप पर्यंत नियमानुसार (प्रोटोकॉलप्रमाणे) प्रदीप परदेशी यांच्या निवडीच्या स्थगितीला कोणत्याही प्रकारचा निरोप अथवा पत्र प्राप्त न झाल्यामुळे प्रदीप मतंवा परदेशी हेच पुणे शहर काँग्रेस ओ. बी. सी. विभागाच्या अध्यक्षपदी कायम राहतील, असे या पत्रकाद्वारे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी सांगितले आहे.

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे प्रदिप मतंवा परदेशी यांची अधिकृतरित्या शिफरशीनंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओ.बी.सी. विभागाचे अध्यक्ष भानुदास माळी यांनी पुणे शहर काँग्रेस ओ. बी. सी. विभागाचे अध्यक्षपदी निवड केली. दि. १२ एप्रिल २०२४ रोजी काही वृत्तपत्रांमध्ये मावळते अध्यक्ष प्रशांत सुरसे हेच अध्यक्ष म्हणून राहतील व प्रदीप परदेशी यांच्या निवडीला स्थगिती देत असल्याचे वाचण्यात आले. परंतु, प्रशांत सुरसे हे गेले ३ वर्षांपासून ओ.बी. सी. विभागाच्या अध्यक्षपदी कार्यरत होते. त्यांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे.

# भारताची आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचा कट

## पंतप्रधान मोदींचा इंडिया आघाडीवर आरोप

पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राजस्थानमधील बाडमेर-जैसलमेर या लोकसभा मतदारसंघात (१२ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. राज्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा मतदारसंघ असलेल्या बाडमेर-जैसलमेर मधून भाजपाने कैलाश चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. चौधरी यांच्या प्राचरासाठी स्वत: पंतप्रधानांनी प्रचारसभा घेतली. या प्रचारसभेत बोलताना पंतप्रधानांनी सीमा सुरक्षा, इंडिया आघाडी आणि आण्विक शस्त्रास्रांवर भाष्य केलं. मोदी म्हणाले, काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या देशातील आण्विक शस्त्रास्रं नष्ट करण्याचा कट रचत आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.



तुम्ही काँग्रेसचा जाहीरनामा पाहिलात तर तुमच्या लक्षात येईल की यावर मुस्लीम लीगचा प्रभाव आहे. भाजपाने आपल्या देशाला आण्विक सक्षम बनवलं. परंतु, काँग्रेस आपली ती शक्ती नष्ट करण्याच्या विचारात आहे. देशाला प्रश्न पडलाय की, नेमकं कोणाच्या सांगण्यावरून इंडी आघाडी आपल्या देशाची आण्विक शस्त्रास्रे नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहे. आपल्या देशाला कमकुवत करण्याचं षडयंत्र रचलं जात आहे. इंडिया आघाडी हे कोणाच्या सांगण्यावरून करतेय? देशाला कमकुवत कण्याचा कट रचणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी या निवडणुकीत लोकांनी भाजपाच्या बाजूने मतदान करण्याची आवश्यकता आहे.

मोदी यांनी यावेळी रिफायनरीद्वारे रोजगार उपलब्ध करण्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच ते म्हणाले, काँग्रेस रिफायनरीच्या विरोधात आहे. ते रिफायनरीच्या कामात अडथळे आणत आहेत. परंतु, मी आश्वासन देतो की मी माझ्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात स्वतः इथे येऊन रिफायनरीचं उद्घाटन करेन.

# ऑस्कर २०२५ तारखेसह नॉमिनेशन टाइमलाइन जाहीर

**मुंबई** : २०२५ मध्ये होणाऱ्या जगातील सर्वात प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्याची तारीख ॲकॅडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसनं जाहीर केली आहे. हा कार्यक्रम कधी आणि कुठे होणार याबद्दलची बातमी आता समोर येत आहे. ऑस्कर सोहळा हा चित्रपट जगतातील सर्वात प्रतिष्ठित समारंभांपैकी एक आहे. प्रत्येक अभिनेता आणि अभिनेत्रीला आयुष्यात एकदा तरी हा पुरस्कार जिंकण्याची इच्छा असते. काल बुधवारी अकादमीनं २०२५ साली होणाऱ्या ऑस्कर सोहळ्यात सहभागी होण्यासाठी नामांकनांच्या टाइमलाइनबद्दल माहिती शेअर केली.

९७ व्या ऑस्कर सोहळ्याची तारीख जाहीर : अकादमीनं पोस्टवर लिहिलं, ''तुमच्या कॅलेंडरची तारीख मार्क करून घ्या, ९७ वा ऑस्कर सोहळा रविवार, २ मार्च २०२५ रोजी होणार आहे.'' हा कार्यक्रम भारतात ३ मार्च रोजी प्रसारित होईल.

वेळेबद्दल बोलायचं झाल्यास, ऑस्कर २०२५चा सोहळा हा संध्याकाळी ७ वाजता इएसटी (एएऊ) आणि एबीसी (अँण)वर पाहता येईल. नामांकनांची घोषणा शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ रोजी केली जाईल. आता ऑस्कर पुरस्कारबद्दलची माहिती समोर आल्यानंतर सर्वत्र पुरस्कारबद्दल धूम सुरू आहे. मागील ९६ व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यात हॉलिवूडमधील अनेक चित्रपटांनी आश्चर्यकारक कामगिरी केली होती. यामुळे या चित्रपटांना अकादमी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

# नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीची मागणी

**काठमांडू** : आम्हाला आमचा देश आणि राजा आमच्या जीवापेक्षा जास्त प्रिय आहे. प्रजासत्ताक रद्द करून देशात राजेशाही परत आली पाहिजे, अशा घोषणा देत नेपाळची राजधानी काठमांडू येथे नागरिक मोठ्या संख्येने बुधवारी रस्त्यावर आले. ते पंतप्रधान कार्यालय आणि इतर सरकारी कार्यालयांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होते. यासोबतच नेपाळमध्ये हिंदू राष्ट्राची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

या आंदोलनावेळी नागरिकांची पोलिसांशी झटापटही झाली. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बांबूच्या लाठीचार्ज, अश्रुधुराचा आणि पाण्याच्या तोफांचा वापर केला. नेपाळच्या राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाच्या नेतृत्वाखाली ही निदर्शने होत होती. यावेळी लोकांनी राजेशाही परत आणण्याच्या घोषणा दिल्या.

नेपाळ २००७ साली हिंदू धर्मनिरपेक्ष देश बनला आणि २००८ साली २४० वर्षांपासून सुरू असलेली राजेशाही अधिकृतपणे संपुष्टात आली आणि निवडणुका झाल्या. तेव्हापासून नेपाळमध्ये १३ सरकारे झाली आहेत.

नेपाळ गेल्या काही काळापासून राजकीयदृष्ट्या अस्थिर आहे.

यापूर्वी प्रजातंत्र पक्षाने फेब्रुवारीमध्ये पंतप्रधान कार्यालयाला ४० कलमी निवेदनही पाठवले होते. यामध्ये भ्रष्टाचाराला आळा घालण्याची मागणी करण्यात आली. खरे तर नेपाळमध्ये २००६ मध्ये राजेशाहीविरुद्धचे बंड अधिक तीव्र झाले. अनेक आठवड्यांच्या निदर्शनांनंतर तत्कालीन राजा ज्ञानेंद्र यांना त्याग करून सर्व सत्ता संसदेकडे सोपवावी लागली. या सगळ्यात राजेशाहीशी संबंधित अनेक गट देशातील प्रमुख पक्षांवर भ्रष्टाचार आणि वाईट कारभाराचे आरोप करत आहेत. देशातील जनता आता भ्रष्टाचारी राजकारण्यांना कंटाळली आहे, असा त्यांचा दावा आहे.

अलीकडेच नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड यांनी नेपाळी काँग्रेस पक्षासोबतची युती तोडली. त्यांनी केपी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (यूएमएल) सोबत नवीन सरकार स्थापन केले, ज्यांची चीन समर्थक भूमिका असल्याचे म्हटले जाते. अशा सर्व कारणांनी त्रस्त असलेली नेपाळी जनता अखेर रस्त्यावर उतरून पुन्हा राजेशाहीची मागणी करीत आहे.

# मुंबईकरांची वाहतुक कोंडीतून सुटका होणार; कोस्टल रोड- सी-लिंकला जोडणार

**मुंबई** : मुंबईकरांचा प्रवास वेगवाग होण्यासाठी पहिल्या टप्प्यात कोस्टल रोड प्रवाशांसाठी खुला करण्यात आला आहे. आता कोस्टल रोड वांद्रे-वरळी सी लिंकला जोडण्यात येणार आहे. त्यामुळं मुंबईकरांचा प्रवास अधिक सोप्पा व जलद होणार आहे. मुंबई महापालिका कोस्टल रोडला वांद्रे वरळी सी लिंकसोबत जोडण्यासाठी १६ किंवा १७ एप्रिल रोजी १२० मीटरपर्यंत गर्डर लाँच करण्याची शक्यता आहे. यामुळं कोस्टल रोड प्रकल्पाच्या उत्तरेकडील बाजूने वांद्रे-वरळी सी लिंक जोडला जाणार आहे.

कोस्टल रोडचे उपमुख्य अभियंता एम.एम. स्वामी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४६ मीटर, ४४ मीटर आणि ६० मीटरचे तीन गर्डर याआधीच पुलाच्या बांधणीसाठी लाँच करण्यात आले आहेत. १२ एप्रिल रोजी न्हावा गावाच्या जेट्टीवर १२० मीटरच्या बो स्ट्रिंग पुलाची कमान बार्जमध्ये लोड करण्यात येईल. त्यानंतर वरळीच्या दिशेने ही बार्ज मार्गस्थ होईल. साधारण १५-१६ तारखेपर्यंत वरळीपर्यंत पोहोचेल. त्यानंतर हवामानाच्या परिस्थितीनुसार, १६ किंवा १७ एप्रिलला हा गर्डर लाँच केला जाईल.

कोस्टल रोडचे वरळीचे टोक आणि दक्षिणेकडील सी लिंक व उत्तरेकडील बाजूची कमान हे अंतर भरुन काढण्यासाठी आठ गर्डर लाँच करण्यात आले आहे. कोस्टल रोड आणि सी लिंक या दरम्यान तयार होणाऱ्या पुलाचे अंतर ८५० मीटर रुंद आणि २७० मीटर रुंद असे असून पुलासाठी वापरले जाणारा धातू हा स्टील असणार आहे.

# जम्मू-काश्मीरच्या पुलवामामध्ये दहशतवादी : सुरक्षा दलांमध्ये चकमक; दहशतवाद्याला कंठस्नान

**पुलवामा** : जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील फारसीपुरा मोरन भागात दहशतवादी आणि सैन्यामध्ये चकमक सुरू आहे. दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात आज सकाळी दहशतवादी आणि सैन्यात चकमक सुरू झाली. मिळालेल्या माहितीनुसार सुरक्षा दलांना या भागात दहशतवादी असल्याची पुष्टी माहिती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी परिसरात शोध मोहीम सुरू केली. शोध मोहिमेदरम्यान दहशतवाद्यांनी सैन्यावर गोळीबार केला. त्याचे चकमकीत रुपांतर झाले. या चकमकीत दहशतवाद्याला कंठस्नान घालण्यात सैन्याच्या जवानांना यश आलेय.

**दहशतवादी लपून बसलेल्या परिसराला वेढा** : प्राप्त माहितीनुसार या भागात दोन ते तीन दहशतवादी लपून बसले आहेत. तर सैन्याच्या ५५ राष्ट्रीय रायफल्स, सीआरपीएफ आणि पोलिसांनी संयुक्तपणे परिसराला वेढा घातलाय. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू आहे. उल्लेखनीय म्हणजे बुधवारी पुलवामा जिल्ह्यात दहशतवादी आणि सैन्य यांच्यात झालेल्या चकमकीला जवळपास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर, शोपियान जिल्ह्यात अज्ञात लोकांनी परप्रांतीय व्यक्तीची हत्या केली होती.

एका दहशतवाद्याचा खात्मा : सध्या खोऱ्यात राजकीय घडामोडी जोरात सुरू आहे. दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी आणि जनतेला सुरक्षितता मिळवून देण्यासाठी पोलीस आणि सैन्य विविध भागात शांतता राखण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत. सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिल्यावर दहशतवाद्यांनी सर्च पार्टीवर गोळीबार केल्याची पुष्टी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी केली.

# सुट्टीच्या दिवशी भरविली शाळा; बस पलटी होऊन सात विद्यार्थ्यांचा मृत्यू

**महेंद्रगड (हरियाणा)** : हरियाणाच्या महेंद्रगड जिल्ह्यात स्कूल बस उलटून ७ मुलांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. या अपघातात अनेक शाळकरी मुलं जखमी झाली आहेत. महेंद्रगड जिल्ह्यातील कनिना उपविभागातील उन्हानी गावाजवळील वळणावर जीएल पब्लिक स्कुल शाळेची बस पलटी झाल्यानं हा अपघात झालाय.

**बसमध्ये होती ३५-४० मुलं** : सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जीएल पब्लिक स्कूल या खासगी शाळेच्या बसमध्ये सुमारे ३५ ते ४० मुलं होती. आज सरकारी सुट्टीच्या दिवशीही शाळा भरवण्यात आल्या होत्या.

अपघात झालेल्या ठिकाणी तीव्र वळण असल्याने चालकाचे बसवरील ताबा सुटला. त्यामुळं बस झाडावर आदळली. त्यामुळे बस पलटी झाली.

**सरकारी सुट्टी असूनही शाळा सुरु** : या अपघाताचा व्हिडिओही समोर आला आहे. बाब म्हणजे आज ईदनिमित्त सरकारी सुट्टी असतानाही शाळा सुरु होती.

या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचला. जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात पाठवण्यात येतंय. त्याचवेळी घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले. हा अपघात कशामुळं झाला हे मात्र अद्याप समजू शकलेले नाही.

**चालक मद्यधुंद होता** : मिळालेल्या माहितीनुसार अपघाताच्या वेळी बस चालक हा मद्यधुंद अवस्थेत होता. चालकाची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. अहवाल आल्यानंतरच चालक मद्यधुंद होता की नाही, हे सांगता येईल.

**दोषींवर कठोर कारवाई केली जाईल** : या अपघातानंतर हरियाणाचे शिक्षण राज्यमंत्री सीमा त्रिखा यांनी म्हटलंय की, ''या अपघातातील दोषींना सोडलं जाणार नाही. ७ घरांमध्ये अंधकार झाला. आहेत. ही अत्यंत दु:खद घटना आहे. यात जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

मी माझ्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी पोहोचण्यास सांगितलं आहे.

मी स्वत: घटनास्थळी पोहोचत आहे. सरकारी सुट्टीच्या दिवशी शाळा उघडणं कायद्याचे उल्लंघन आहे. शाळा प्रशासनावरही कारवाई केली जाईल. बसचीही तपासणी केली जाईल.''

मुलीला पाहण्यासाठी गेलेल्या पालकांचाही अपघात : महेंद्रगडमध्ये स्कूल बसच्या अपघातात अनेक कुटुंबात शोककळा पसरलीय. अपघाताची माहिती मिळताच आई-वडील आपल्या मुलीला पाहण्यासाठी धावले. त्यांचाही वाटेत अपघात झाला. यात मुलीच्या आईचा पाय मोडला आहे. या स्कूल बसच्या अपघातात त्यांच्या मुलीचाही मृत्यू झाल्याची माहिती सुत्रांनी दिलीय.

# 'शरद पवार निखारा, ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है'; खासदार अमोल कोल्हे

**पुणे** : 'शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील निखारा आहेत. त्या निखाऱ्याचा करिष्मा प्रत्येकाच्या मनावर गारुड करणारा आहे. आम्ही फक्त त्यावरची राख दूर करण्याचा प्रयत्न करत असून हा तर सगळा ट्रेलर आहे, चित्रपट बाकी असल्याची प्रतिक्रिया खासदार अमोल कोल्हे यांनी आज पुण्यात दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात होणाऱ्या पक्ष प्रवेशाबाबत ते बोलत होते.

हा ट्रेलर आहे : यावेळी अमोल कोल्हे म्हणाले, ''शरद पवारांच्या कर्तृत्वाचं गारुड महाराष्ट्रभर एवढं मोठं आहे, हा फक्त ट्रेलर आहे. पिक्चर आणखी बाकी आहेत. शरद पवार साहेबांच्या मागं संपूर्ण महाराष्ट्र एकवटलाय. एकापाठोपाठ एक प्रत्येक जण आपली भूमिका मांडतोय प्रत्येकाला ते पटतय त्यामुळं हे पक्ष प्रवेश होत आहेत.'' शिरुर लोकसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख त्याचबरोबर धैर्यशील मोहिते पाटील, रामराजे निंबाळकर यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश होणार असल्याची चर्चा आहे. यापूर्वी अमोल कोल्हे यांनी निलेश लंके यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांचा पक्षप्रवेश झाला. त्यानंतर त्यांनी मोहिते पाटलांची भेट घेतली त्यांचाही पक्षप्रवेश निश्चित झालेला आहे. त्यामुळं हा सगळा ट्रेलर आहे, पिक्चर आणखी बाकी असल्याची प्रतिक्रिया अमोल कोल्हे यांनी आज दिली.

आढळराव पाटलांना टोला : पाच वर्षात पाच पक्ष बदलणारा देशातील एकमेव आमचा शिरुर मतदार संघ आहे.

# मुस्लीमऱ्यादवांच्या पलीकडे जाण्याचा लालूंच्या पक्षाचा प्रयत्न

**पटणा** : सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. बिहारमध्येही राजकीय नाट्य चांगलेच रंगात आले आहे. नितीश कुमारांनी इंडिया आघाडीची साथ सोडून एनडीएबरोबर जाणे पसंत केल्याने बिहारमधील राजकीय गणिते पुन्हा एकदा विस्कटून गेली आहेत. बिहारच्या राजकारणातील आणखी एक महत्त्वाचा पक्ष म्हणजे राष्ट्रीय जनता दल होय. या लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय जनता दल ४० पैकी २३ जागांवर निवडणूक लढणार आहे. या निवडणुकीसाठीची त्यांची रणनीती काय असणार आहे, ते समजून घेऊयात.

राष्ट्रीय जनता दल (राजद) या निवडणुकीसाठीही आपले जुनेच सूत्र वापरणार आहे, असे दिसून येत आहे. मुस्लीम आणि यादवांवर त्यांची भिस्त आहे. पक्षाने आठ यादव, दोन मुस्लीम, तर १२ ओबीसी उमेदवार दिले आहेत. एकूण जाहीर केलेल्या २२ जागांपैकी तीन उमेदवार हे अनुसूचित जाती आणि अतिमागासवर्गीय आहेत, तर दोन उमेदवार हे उच्च जातीचे दिले आहेत.

## राष्ट्रीय जनता दलाने कुणाला दिली उमेदवारी?

'महागठबंधन' म्हणून निवडणूक लढवणाऱ्या राजदने २३ पैकी २२ जागांवरील उमेदवार जाहीर केले असून सिवान या जागेवरील उमेदवार अद्याप जाहीर केलेला नाही. या जागेवर माजी सभापती अवध बिहार चौधरी किंवा मृत माजी खासदार मोहम्मद शाहबुद्दीन यांच्या पत्नी हिना साहब यांना उमेदवारी मिळू शकते.

महागठबंधनमधून मिळाल्या २३ जागा

राष्ट्रीय जनता दल सुरुवातीला २६ जागांवर निवडणूक लढवणार होता. मात्र, जागावाटपामध्ये त्यांनी आपल्या वाटणीच्या तीन जागा या मुकेश साहनी यांच्या विकासशील इन्सान पार्टी ला देऊ केल्या. बिहारमध्ये १९ एप्रिल ते १ जून अशा सातही टप्प्यांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे.

**सहा महिलांना दिली उमेदवारी**

राष्ट्रीय जनता दलाने एकूण सहा महिलांना निवडणुकीच्या आखाड्यात उतरवलेले आहे. यामध्ये शेओहरमधून रितू जैस्वाल, मुंगेरमधून अनिता देवी महतो, पूर्णियामधून विमा भारती, जमुईमधून अर्चना रविदास यांना उमेदवारी आहे; तर राजदचे प्रमुख लालू प्रसाद यांच्या दोन्हीही मुली निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी मिसा भारती या पाटलीपुत्रमधून, तर रोहिणी आचार्य या सारणमधून उमेदवार आहेत.

शेओहरमधून उमेदवारी मिळालेल्या रितू जैस्वाल यांचे सिंघवाहिनी गावच्या सरपंच म्हणून भरपूर कौतुक झाले आहे. त्या एका आयएएस अधिकाऱ्याची पत्नी आहेत. या अधिकाऱ्याने स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेतला आहे, तर दुसरीकडे मुंगेरमधून उमेदवारी मिळलेल्या अनिता देवी महतो या राजकारणात असलेल्या अशोक महतो यांच्या पत्नी आहेत.

राष्ट्रीय जनता दलाने आठ विद्यमान आमदारांनाही उमेदवारी देऊ केली आहे. यामध्ये बोधगयाचे आमदार कुमार सर्वजीत यांना गयामधून, रामगढचे आमदार सुधाकर सिंह यांना बक्सरमधून, सिंहेश्वरचे आमदार चंद्रहास चौपाल यांना सुपौलमधून, जोकीहाटचे आमदार शाहनवाज आलम यांना अररियामधून, बेलागंजचे आमदार सुरेंद्र प्रसाद यादव यांना जहानाबादमधून, उजियारपूरचे आमदार आलोक कुमार मेहता यांना उजियारपूरमधून आणि आमदार ललित यादव यांना दरभंगामधून उमेदवारी मिळाली आहे. उमेदवार अली अशरफ फात्मी यांना मधुबनी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

राष्ट्रीय जनता दलाची यादव जातीच्या नागरिकांवर मोठी भीस्त आहे. पक्षाने पाटलीपुत्र (मिसा भारती), सारण (रोहिणी आचार्य), दरभंगा (ललित यादव), सीतामढी (अर्जुन राय), बंका (जयप्रकाश नारायण), वाल्मिकी नगर (दीपक यादव) आणि मधेपुरा (कुमार चंद्र दीप) या ठिकाणी यादवांना उमेदवारी दिली आहे.

**अतिमागासवर्गीयांना आपलेसे करण्याचा प्रयत्न**

पक्षाला यादव आणि मुस्लीम यांच्या पलीकडे जाऊन आपला विस्तार करायचा आहे. त्यामुळे राष्ट्रीय जनता दलाचे लक्ष्य सध्या कुशवाह आणि कुर्मी (लव-कुश) यांच्यावरही आहे. आपल्या उमेदवार यादीमध्ये या दोन्ही जातींना पक्षाने प्राधान्याने प्रतिनिधित्व दिले आहे. उझियारपूरमधून मेहता, श्रावण कुशवाह यांना नवाडामधून आणि अभय कुशवाह यांना औरंगाबादमधून उमेदवारी दिली आहे. हे तीन कोरी (ओबीसी) जातीचे आहेत.

# न झालेल्या आजारावरही केले उपचार, पदरी पडले त्याचे भयानक परिणाम!

**वॉशिंग्टन** : अमेरिका टेक्सासमधील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. वास्तविक येथील एका महिलेच्या पॅथॉलॉजी रिपोर्टमध्ये ती कॅन्सर ग्रस्त असल्याचे समोर आले होते. त्यानंतर महिलेवर केमोथेरपी उपचार सुरू करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान या महिलेला कॅन्सर झाला नसल्याचे आता उघडकीस आले आहे. न झालेल्या आजारावर उपचार केल्यामुळे पीडित महिलेला त्याचे गंभीर परिणाम सहन करावे लागत आहेत.

अमेरिकन माध्यमांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लिसा मोंक (३९) असे महिलेचे नाव असून २०२२ मध्ये ती पोटदुखीच्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल झाली होती. किडनी स्टोनच्या समस्येमुळे हा त्रास होत असल्याची महिलेला शंका होती. तर चाचणी अहवालात किडनी स्टोन असल्याचेही समोर आले, परंतु महिलेची प्लीहा (एज्ताह) मोठी झाल्याचे आढळून आले. यानंतर गेल्या वर्षी जानेवारीमध्ये महिलेच्या प्लीहावर शस्त्रक्रिया करून अतिरिक्त भाग काढण्यात आला. शस्त्रक्रियेतून काढलेला प्लीहाचा अतिरिक्त भाग तपासणीसाठी पाठवण्यात आला. तीन ठिकाणी पाठवण्यात आलेल्या पॅथॉलॉजी लॅबच्या अहवालात योग्य माहिती मिळू शकली नाही, तेव्हा त्याला चौथ्या लॅबमध्ये पाठवण्यात आले, तेथे या महिलेला कॅन्सर असल्याचे सांगण्यात आले.

महिला कॅन्सरग्रस्त आहे असं समजल्यामुळे रुग्णालयात महिलेची केमोथेरपी (ण्पस्दूपीरज्ब) सुरू करण्यात आली. मात्र, केमोथेरपीचे उपचार घेतल्याने या महिलेच्या डोक्यावरील सर्व केस गळून गेले आहेत. त्याचबरोबर महिलेची त्वचाही खराब झाली आहे. एप्रिलमध्ये जेव्हा ही महिला नियमित तपासणीसाठी रुग्णालयात गेली असता तिला कर्करोग नाही आणि ती ठीक आहे, असे सांगण्यात आले. ही बातमी ऐकून महिलेला आश्चर्य वाटले. या प्रकरणात रुग्णालयाने अत्यंत निष्काळजीपणा दाखवला आहे. तिच्या दुसऱ्या केमोथेरपीपूर्वीच लॅबचा रिपोर्ट हॉस्पिटलमध्ये पोहोचला होता, पण हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी रिपोर्टकडेही पाहिले नाही आणि तिला केमोथेरपी उपचार देण्यात आले, असे महिलेचे म्हणणे आहे. डॉक्टरांच्या आणि रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे या महिलेला जोरदार फटका बसला आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही या गोष्टीचा थरकाप उडाला आहे.

# अवघ्या चार तासात ओलांडता येणार महाराष्ट्राची हद्द ; वंदे भारतसंदर्भातील सर्वात मोठी अपडेट

**मुंबई** : भारतीय रेल्वेला एका नव्या स्तरावर नेणाऱ्या वंदे भारत या वेगवान रेल्वेनं आतापर्यंत प्रवाशांच्या बहुतांश अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. प्रवासवेळेत मोठ्या फरकानं होणारी बचत, पाहया अनेकांचीच या रेल्वेला पसंती. खिशाला परवडणाऱ्या दरात चांगल्या प्रवासाची हमी देणाऱ्या याच वंदे भारतनं आता एक नवा टप्पा ओलांडला असून लवकरच प्रवाशांना या रेल्वेसेवेचा नवा स्तर अनुभवता येणार आहे.

कमीत कमी वेळेत मोठं अंतर ओलांडून प्रवाशांना अपेक्षित ठिकाणी पोहोचवणाऱ्या या वंदे भारतसंदर्भातील अत्यंत महत्त्वाची माहिती नुकतीच समोर आली आहे. या माहितीनुसार येत्या काळात या अतिजलद रेल्वेगाडीचा वेग वाढवण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. सध्याच्या घडीला वंदे भारत ताशी १३० किमी इतक्या वेगानं धावते. येत्या काळात हाच वेग ताशी १६० किमी पर्यंत नेण्यात येणार असून, रेल्वेच्या वेगमर्यादेअंतर्गत राहूनच हे प्रयत्न सुरु आहेत. ज्यासाठी पश्चिम रेल्वेनं वंदे भारत तिच्या सर्वाधिक वेगानं चालवण्याची परवानगीसुद्धा दिली आहे. मुंबई ते अहमदाबाददरम्यान ही ट्रायल रन घेण्यात येणार आहे.

# शशिकांत शिंदे यांच्या उमेदवारीने जावळीत चैतन्याचे वातावरण

## जावळीतील खासदार करण्याची जावळीकरांना संधी !



**मेढा/दत्तात्रय पवार**

जावळी तालुक्याचे सुपुत्र असलेले व १९९९,२००४ अशी दहा वर्षे जावळी -महाबळेश्वर मतदार संघाचे आमदार राहिलेले शशिकांत शिंदे यांना शरद पवार यांनी महाविकास आघाडी कडून सातारा लोकसभेचे उमेदवारी दिल्याने संपूर्ण जावळी तालुक्यामध्ये चैतन्यचे वातावरण निर्माण झाले आहे. आतापर्यंत जावळी तालुक्यातून खासदार निवडून गेलेला नाही. त्यामुळे आता जावळीकरांना शशिकांत शिंदे यांच्या रूपाने खासदार निवडून देण्याची नामी संधी शरद पवार यांनी प्राप्त करून दिली आहे.

१९९९ राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून सातारा जिल्हा हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिला आहे.जावळी- महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघात १९९९ मध्ये मुंबई मधून येऊन शशिकांत शिंदे यांनी कणखरपणे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले .दहा वर्ष आमदार शशिकांत शिंदे या मतदारसंघाचे आमदार होते .त्यामुळे त्यांना मानणारा एक मोठा गट या तालुक्यामध्ये कार्यरत आहे. तर नंतर मतदार संघाच्या पुनर्रचनेनंतर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले हे सध्या या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. भाजप आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची एक हाती सत्ता सातारा जावळी तालुक्यामध्ये दिसून येत आहे. तरी देखील स्थानिक भूमिपुत्र म्हणून आमदार शशिकांत शिंदे यांच्या पाठीशी सहानुभूतीचे वातावरण निर्माण झालेले पाहायला मिळत आहे. हे सहानुभूतीची वातावरण मतांमध्ये कशा पद्धतीने परावर्तित होते हे आगामी काळात दिसून येईल.

जावळी तालुक्यातील बोंडारवाडी ,महू-हातगेघर धरणांचे प्रश्न ऐरणीवर आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये देखील विकासात्मक वाटचाल करणाऱ्या पक्षाच्या बाजूने येथील मतदार आपला कौल लोकसभेच्या योग्य उमेदवाराला देतील अशी राजकीय परिस्थिती आहे .आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले व जावळीचे सुपुत्र म्हणून आमदार शशिकांत शिंदे या दोन्ही आमदारांनी बोंडारवाडी तसेच महू-हातगेघर धरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत, करीत आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये देखील काही अंशी संभ्रम निर्माण झालेला पाहायला मिळत आहे.

यापूर्वी जावळी तालुक्याचे भाजप नेते वसंतराव मानकुमरे यांनी कराड लोकसभा मतदारसंघातून धनुष्यबाण हातात घेऊन वाळवा शिराळ्यापर्यंत आपले नेतृत्व पोहोचवले होते.मात्र त्यांना यश आले नाही. तदनंतर तब्बल ३० वर्षानंतर जावळी तालुक्यातील आमदार शशिकांत शिंदे यांच्या रूपाने खासदारकीची उमेदवारी जावळी तालुक्याला मिळाली आहे. महाविकास आघाडी कडून उमेदवारी जाहीर होताच आमदार शशिकांत शिंदे यांनी तुतारीच्या निनादात सातारा जिल्ह्याच्या वेशीवर प्रवेश केला.

पाचवड येथे जावळी तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते त्याचबरोबर महिला- युवक वर्गाच्या उपस्थितीत शशिकांत शिंदे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यामुळे एकंदरीतच जावळी तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झालेले या निमित्ताने पाहायला मिळत आहे. जावळीचा सुपुत्र खासदार करण्याच्या दृष्टीने शरद पवार यांनी जावळीकरांना आमदार शशिकांत शिंदे यांच्या रूपाने संधी दिलेली आहे. या संधीचे शशिकांत शिंदे कशा पद्धतीने सोने करतात हे आगामी काही दिवसांमध्ये पाहायला मिळणार आहे.

## चोरीच्या दोन घटनांत ६ लाखांचा ऐवज चोरीला

**पुणे :** शहरात घरफोडीच्या घटनांत वाढ होत असून, दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी सव्वा सहा लाखांचा ऐवज चोरून नेला आहे. कोथरूड तसेच वानवडी परिसरात या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात ४२ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यानूसार, अज्ञात चोरट्यांवर गुन्हा नोंद केला आहे.

तक्रारदार महिलेचा महात्मा सोसायटी येथील कृष्णा टेरेस समोर बंगला आहे. तक्रारदार ५ ते ९ एप्रिल या कालावधीत काही कामानिमित्त बाहेर गावी गेलेल्या होत्या. याचदरम्यान चोरट्यांनी घराचे कुलूप उचकटून आत प्रवेश केला. तसेच, बेडरूममध्ये असलेल्या कपाटील ४ लाख ५० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. तर, दुसरी घटना हांडेवाडी येथे घडली असून, चोरट्यांनी बंद घर फोडून साडे चार लाखांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी ५१ वर्षीय व्यक्तीने वानवडी पोलिसांत तक्रार दिली आहे. ही घटना २४ मार्च ते ८ एप्रिल या कालावधीत घडली आहे.

# लोकअदालत मोहिमेत ३९७ वाहनांवरील ३ लाख ९३ हजारांचा दंड वसूल

- वाहतूक शाखा व पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार
- २ दिवसात ४ लाखांची वसुली
- सध्या लोकअदालत पुढे गेल्याने मोहीम तात्पुरती स्थगित

**राजदंड / बारामती**

बारामती वाहतूक शाखा व पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारातून वाहतूक नियमांचे उल्लंघन केलेल्या वाहनांसाठी ५० टक्के सवलतीत दंड वसुलीची 'लोकअदालत' मोहिम राबवण्यात आली होती. या मोहिमेत ३९७ वाहनांवरील ३ लाख ९३ हजार ७०० रुपये दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांना ई-चलन मशीनद्वारे दंड झालेल्या वाहनांना ५० टक्के रकमेच्या सवलतीत दंड भरण्याची मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. दि.८ व १० एप्रिल सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत येथील बारामती वाहतूक शाखा नवीन इमारत (बारामती हॉस्पिटलजवळ) ही लोकअदालत पार पडली. दि.८ रोजी १२८ ई-चलन खटल्यांचे १ लाख ३३ हजार तर दि.१० रोजी २६९ ई-चलन खटल्यांचे २ लाख ६० हजार ७०० असे एकूण ३९७ ई-चलन खटल्यांचे एकूण ३ लाख ९३ हजार ७०० रुपये दंड स्वरूपात वसुल करण्यात आले आहेत.

बारामती, दौंड, इंदापूर परिसरातील वाहन चालक व मालकांनी या मोहिमेत सहभाग घेऊन आपल्या ऑनलाईन दंडाची रक्कम सवलतीत भरली. त्यांना ५० टक्के सवलत देण्यात आली. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा वाचला.

ही सुविधा बारामती येथे सुरु करण्यासाठी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी मोटार वाहन न्यायालय शिवाजीनगर पुणे येथील न्यायाधीश एस.एच. वानखडे, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव, बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष गिरिगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी विशेष प्रयत्न केले. बारामती वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार, पुणे न्यायालयातील न्यायालयीन कर्मचारी सुधीर वानखडे, विक्रम पाठक, प्रकाश कुकडे, नितीन गायकवाड, विजय चव्हाण या मोहिमेच्या कार्यवाहीसाठी उपस्थित होते.



> **“ 'लोकअदालतची तारीख ही जुलै महिन्यात गेल्याने सध्या लोकअदालत स्थगित करण्यात आली आहे. नागरिकांचा प्रतिसाद पाहता आणखी प्रकरणे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास येते. लोकअदालत सुरु झाल्यानंतर नागरिकांना त्याबाबत कळवण्यात येईल. त्यावेळी दंडाची रक्कम भरता येईल.**
>
> **– चंद्रशेखर यादव, पोलीस निरीक्षक**

# सातारा जिल्ह्यात 'रमजान ईद' पारंपरिक पद्धतीने साजरी

## आमदार शिवेंद्रसिंहराजे व खासदार उदयनराजे यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा!

**राजदंड / सातारा**

सातारा जिल्ह्यात शुक्रवारी रमजान ईद ईद-उल-फित्र हा मुस्लिम बांधवांचा पारंपारिक सण उत्साहात साजरा करण्यात आला . जिल्ह्यात ठिकठिकाणी मुस्लिम बांधवांनी मशिद तसेच ईदगाह मैदानावर नमाज पठण केले यानंतर एकमेकांना आलिंगन देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या .रमजान ईद च्या निमित्ताने फळ आणि सुकामेवा बाजारामध्ये मोठी उलाढाल झाली.

साताऱ्यातील सदर बाजार येथील ईदगाह मैदानावर सातारा शहर पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांच्यासह सातारा पोलिसांनी मुस्लिम बांधवांची गळा भेट घेऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या तसेच पोलिसांनी मुस्लिम बांधवांना नमाज पठानंतर गुलाब पुष्प भेट देऊन आपला भाईचारा दाखवून दिला . यावेळी पोलीस निरीक्षक सतीश तांबे सहायक पोलीस निरीक्षक विलास शितोळे इत्यादी पोलीस कर्मचारी उपस्थित होते . आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सुद्धा सदर बाजार येथील ईदगाह मैदानावर जाऊन मुस्लिम बांधवांना सकाळी शुभेच्छा दिल्या या रमजान सणानिमित्त सर्वांमधील सलोखा प्रेम बंदोबान कायम राहो अशी मी अल्लाह चरणी प्रार्थना करत असल्याचे आमदार शिवेंद्रसिंहराजे यांनी सांगितले . खासदार उदयनराजे भोसले यांनी ही लोकसभा प्रचाराची व्यस्तता असतानाही विशेष संदेशाद्वारे साताऱ्यातील बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या .

साताऱ्यात सुद्धा रमजानचा हा उत्साह दिसून आला गेल्या एक आठवड्यापासून बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होती . रमजानच्या पूर्वसंध्येला दूध सुकामेवा कपड्यांच्या खरेदीसाठी मुस्लिम बांधवांची गर्दी दिसून आली .चंद्र दर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी रमजान ईद साजरी केली जाते सातारा शहरातील सदर बाजार व राजपथशाही मशिद, गेंडा माळ नाका येथील ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांनी पारंपारिक पद्धतीने नमाज पठण केले सातारा शहरात शुक्रवारी दिवसभर सर्व धर्मीय नागरिकांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.





# सडा दाढोली येथे मतदार जनजागृती कार्यक्रम



**राजदंड / पाटण**

सडादाढोली ता पाटण येथील अंगणवाडीमध्ये मतदार जनजागृती मोहीम अंतर्गत विविध प्रकारच्या रांगोळ्या, घोषवाक्य पर बॅनर, मतदान करणे बाबतच्या सूचना संदेश, महिला मेळावा, प्रभात फेरी इत्यादी प्रकारचे विविध कार्यक्रम त्या ठिकाणी घेण्यात आले.

एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी मा.राजश्री बने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास पर्यवेक्षिका एस के शेलार तसेच चाफळ बीट मधील सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी अंगणवाडी सेविका सविता झोरे मॅडम व मदतनीस भारती झोरे यांनी फार मोठे परिश्रम घेतले.

# तरुणाचा जीव वाचवणाऱ्या बाबा शिंदेचा पोलिसांकडून सन्मान

**राजदंड / वडूज**

वडूज शहरातील बस स्थानक लगत असणाऱ्या रिक्षा स्टॉप वर एका रिक्षा चालकाकडून झालेल्या जीवघेणा हल्ल्या वेळी जीवाची परवा न करता जखमी युवकाला वाचवणाऱ्या विनोद उर्फ बाबा शिंदे यांचा वडूज पोलिसांच्या वतीने सन्मान करण्यात आला . घटनेचे गांभीर्य ओळखून बाबा शिंदे यांनी हल्लेखोर हिमत पाटोळे याच्या हातातील शस्त्र काढून घेतल्याने मोठा अनर्थ टळला होता. त्यांच्या या कार्याचे वडूज नगरीत कौतक होत आहे. या निमित्ताने आज वडूज पोलिसांनी त्यांच्या या धाडसाचे कौतुक केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की वडूज येथील शंभर फूट अंतरावर असलेल्या उप विभागीय पोलिस अधिकारी कार्यालयासमोर रिक्षा चालक हिम्मत विठ्ठल पाटोळे याने शिवी गाळ करत तू माझे देवाचे चांगले का बघितले नाहीस तुला आता जिवंत ठेवत नाही असे म्हणून अक्षय प्रकाश जाधव (वय २७) यास धारधार चाकूने पोटावर हातावर व छातीवर वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अक्षय जाधव यांना वडूज येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सातारा येथे दाखल करण्यात आले होते.

दरम्यान घटना घडतेवेळी मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक विनोद उर्फ बाबा शिंदे यांनी तातडीने त्या ठिकाणी जाणून हल्लेखोर याच्या हातात असणारे शस्त्र शिताफीने ताब्यात घेतले व जखमी अक्षय जाधव याला आरोपी हिमत पाटोळे याच्या तावडीतून सोडवले. या कामगिरी बद्दल वडूज पोलिसांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विजय शिंदे, माजी नगरसेवक शहाजीराजे गोडसे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.



> **घटना घडतेवेळी दहा मिनिट लोक फक्त बघ्याची भूमिका घेत होते. हल्लेखोराच्या हातात शस्त्र असल्याने पुढे कोणीही जात न्हवते मात्र बाबा शिंदे यांनी जीवाची पर्वा न करता हल्लेखोराकडून शस्त्र ताब्यात घेतले आणी जखमी अक्षय जाधव याचा प्राण वाचवला. त्यांच्या या धाडसी पणाचे कौतुक केले जात असतानाच आता जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख यांनी त्यांचा सन्मान करावा अशा प्रतिक्रिया वडूजकरांचातून व्यक्त होत आहेत.**

# रयत इंग्लिश मिडीयम स्कूलतर्फे रयत सेवकाचा सत्कार!



**राजदंड / दहिवडी**

दहिवडी, ता. माण कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल दडस सर यांची रयत शिक्षण संस्था सातारा यांचेकडून आजीव रयत सेवक म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल झाली रयत इंग्लिश मीडियम स्कूल दहिवडी या ठिकाणी प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रा.डॉ.अनिल दडस यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना ते आज पर्यंत संस्थेकडून हाती घेतलेले सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.रयत सेवकांनी निष्ठेने काम करत रहावे.या सेवेचे निश्चितच फळ मिळेल.संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थकी लावून प्रामणिकपणे सेवा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल डॉ.प्रा.अनिल दडस यांचे मुख्याध्यापिका सौ.भारती प्रदीप जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खिलारे सर यांनी केले तर आभार स्वामी सर यांनी मानले.

## शेतकरीपुत्र ते कॅप्टन पदापर्यंतचा प्रवास

# कुमठ्याच्या राजकुमार चव्हाण यांची गरूडझेप...

**राजदंड / कोरेगाव**

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यामध्ये कुमठे गावचे राजकुमार चव्हाण हे शेतकरी कुटुंबातील आहेत. आपल्या आई-वडीलांचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी धडपडणाऱ्या सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील सैन्य अधिकाऱ्याची यशोगाथा, आजच्या तरुण पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

कोरेगाव तालुक्यातील कुमठे (धारनाथनगर) येथील अत्यंत सामान्य कुटुंबामध्ये वावरणाऱ्या राजकुमार यांची स्वप्ने साधीच होती, परंतू ती पूर्ण करण्याची जिद्द मात्र तितकीच मोठी होती. स्वताच्या जिद्दीवर त्यांनी अधिकारी गणवेश आपल्या अंगावर चढवला.त्यांच्या आई सौ. सुनिता व त्यांचे वडील श्री बळवंत चव्हाण यांनी संस्काराचे आणि गुणवत्तेचे बाळकडू पाजले, त्यांचे थोरले बंधू उमेश यांनीही त्यांच्या शिक्षणात मोलाचा वाटा उचलला.


देशसेवेचे व्रत घेतल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यातून देशभरात आपला ठसा उमटवला, आर्मी मेडिकल कोरमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या राजकुमार यांनी नुकतीच कॅप्टनपदी गरुडझेप घेतली व आपल्या गावचे व तालुक्याचे नाव उज्वल केले. घरची परिस्थिती बिकट असतानाही मुलाला शिकवण्याचे ध्येय राजकुमार यांच्या आई-वडील दोघांचेही होते. त्यांनी प्राथमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल कुमठे इथून पूर्ण केले त्यांचे पुढचे शिक्षण त्यांनी सातारा येथील यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेजमधून बीएससी (बायोलॉजी) पूर्ण केले. यातच त्यांनी सोलापूर येथे सन २०११ साली झालेल्या आर्मी ओपन रॅलीमध्ये पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले आणि आर्मी मेडीकल कोरमध्ये नर्सिंग असिस्टंट या पदावर रुजू झाले. त्यावेळी ते अवघे १९ वर्षाचे होते.



सुरूवातीचे खडतर बेसिक ट्रेनिंग लखनऊमध्ये पूर्ण करून त्यांनी मेरिटच्या जोरावर रेडिओग्राफी विभाग मिळवला. रेडिओग्राफी विभागाचे पुढचे प्रशिक्षण त्यांनी ए.एफ.एम.सी, पुणे व कमांड हॉस्पिटल कोलकाता येथे यशस्वीरीत्या पूर्ण केले. ट्रेनिंग करत असतानाच त्यांनी अधिकारी पदाचे स्वप्ने पहावयास सुरुवात केली.व त्यानुसार डड्ड साठी प्रयत्न सुरु केले. ट्रेनिंग पूर्ण करून त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी ए (इंग्लिश) पदवी संपादित केली. त्यानंतर एक्स रे डिप्लोमा (सिम्बायोसीस इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स, पूणे) इथून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केला. यानंतर त्यांनी आर्मी तर्फे होणाऱ्या बी. एस्सी. (रेडियोग्राफी) ची पदवी महाराष्ट्र युनिवर्सिटी ऑफ हेल्थ सायंस,नाशिक येथून संपादित केली. त्यानंतर त्यांनी १८० मिलिटरी हॉस्पिटल व कमांड हॉस्पीटल, चंदिगड येथे सीटी स्कॅन, एमआरआय विभागामध्ये प्रशंसनीय काम केले. त्यांच्या अर्धांगिनी सौ रेश्मा यांनी त्यांच्या पूर्ण वाटचालीमध्ये मोलाची साथ दिली व सदैव त्यांना पाठबळ देत राहिल्या. नऊ वर्षाच्या अथक परिश्रमानंतर व पाच अपयशानंतर त्यांना सहाव्या प्रयत्नात १९ डड्ड प्रयागराज मधून यश मिळाले. व त्यांची लेफ्टनंट पदासाठी निवड झाली, अधिकारी पदाचे ट्रेनिंग लखनऊमध्ये पूर्ण करुन त्यांची तैनाती १८८ मिलिटरी हॉस्पिटलमध्ये झाली. तेथे त्यांनी हॉस्पिटल लॉजिस्टिक विभागामध्ये प्रशंसनीय काम करून कर्तव्य बजावले.

नुकतेच २५ मार्च २०२४ ला त्यांचे कॅप्टनपदी प्रमोशन झाले, जवानापासून ते कमिशन्ड अधिकारी हा प्रवास त्यांच्यासाठी खूपच खडतर आणि तेवढाच प्रेरणादायक आहे. त्यातून पुढे जाताना आपल्या शाळेचे, गावाचा खूप अभिमान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात आपल्या जिल्ह्यातील होतकरू तरुणांना अत्यावश्यक मार्गदर्शन करण्याचे ध्येय त्यांनी मनोगतात सांगितले.

# स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त वडूज येथे भाविकांची तुडूंब गर्दी



**राजदंड / वडूज**

स्वामी समर्थ म्हटलं की, 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' हे वाक्यचं भक्तांना मोठा आधार देवून जातं. याची प्रचिती आजच्या कलियुगातही असंख्य स्वामीभक्तांना वारंवार येते. दरम्यान, श्री स्वामी समर्थ यांचे आशिर्वादाने व प्रेरणेने खटाव तालुक्यातील वडूजमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील आध्यात्मिक वैभवात भर टाकणाऱ्या सुंदर व दिमाखदार भव्य श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये स्वामींचा प्रकटदिन सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात पार पडला.

रविवार दि. ७ एप्रिल ते बुधवार दि. १० एप्रिल अखेर श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकटदिन सोहळ्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं. यामध्ये स्वामी जप, भजन, किर्तन, भावगीते, भक्तीगिते, महाप्रसाद आदी विविध कार्यक्रम संपन्न झाले.

बुधवार दि. १० एप्रिल रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत सौ. नेत्रा भंडारे, विटा, यांचं सुश्राव्य कीर्तन झाले. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती,तर साडेबारा वाजता पालखी प्रदक्षिणा काढण्यात आली.

दुपारी १.०० वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत भाविकांनी दर्शनासाठी व महाप्रसादासाठी मोठया रांगा लावल्या होत्या. गेली दहा ते बारा वर्षांपूर्वी एका पिंपरणीच्या झाडाखाली सुरु केलेल्या श्री स्वामींच्या प्रकट दिनाला आजच्या मितीला भाविकांचा अक्षरशः महापूर पहावयास मिळाला.

श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट महाराज) देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट, वडूज श्री स्वामी समर्थ मंदिर,समर्थ नगर, दहिवडी रोड, वडूज, ता. खटाव यांच्या वतीने कार्यक्रमाचं उत्तमरित्या नियोजन करण्यात आलं.

# शिल्पा शेट्टीने 'बडे मियाँ छोटे मियाँ' पाहिल्यानंतर एक्स बॉयफ्रेंड अक्षय कुमारचे केले कौतुक






अभिनेता अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ स्टारर ॲक्शन-थ्रिलर चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' ईदच्या दिवशी प्रदर्शित झाला आहे. जवळपास ३५० कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या ॲक्शन चित्रपटात अक्षय आणि टायगरने अनेक स्टंट केले आहेत. आता पहिल्याच दिवशी या चित्रपटाला प्रेक्षकांचं किती प्रेम मिळते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान बुधवारी 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचे स्पेशल स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये हिंदी चित्रपटसृष्टीतील स्टार्स आले होते. हा चित्रपट सेलिब्रिटींना खूप आवडला. अक्षय कुमारची एक्स गर्लफ्रेंड शिल्पा शेट्टी कुंद्राने 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचे कौतुक केले आहे.

शिल्पा शेट्टीने केले एक्स बॉयफ्रेंड अक्षय कुमारचे कौतुक : सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपट पाहिल्यानंतर शिल्पा शेट्टीने तिच्या मुलाचा टायगर श्रॉफबरोबरचा एक फोटो शेअर करत पोस्टवर लिहिले, ''छोटे मियाँबरोबर बडे मियाँ, काय ॲक्शन चित्रपट आहे, खूप मनोरंजक. अक्षय कुमार, टायगर, सोनाक्षी सिन्हा, मानुषी. चिल्लर, आलिया इब्राहिम, दीपशिखा देशमुख, जॅकी भगनानी, तुम्ही अप्रतिम काम केलेस. अली अब्बास तू इतका अप्रतिम चित्रपट बनवल्याबद्दल तुझा अभिमान आहे, पूर्णपणे मनोरंजन करणारा चित्रपट आहे.'' आता शिल्पाची ही पोस्ट सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.

'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाबद्दल : अक्षय कुमार आणि शिल्पा शेट्टीचं अफेअर खूप गाजले होते. शिल्पा आणि अक्षय लग्न करणार होते, पण अक्षयच्या आयुष्यात एकामागून एक अभिनेत्री येत राहिल्या. यामध्ये रवीना टंडनचंही नाव सामील होतं. अखेर अक्षयनं ट्विंकल खन्नाला आपला जोडीदार निवडलं. दरम्यान शिल्पानं एक्स-बॉयफ्रेंड अक्षयचं कौतुक केल्यानंतर ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. 'बडे मियाँ छोटे मियाँ' हा चित्रपट पूजा एंटरटेनमेंट बॅनरखाली बनविण्यात आला आहे. या चित्रपटाचे निर्माते अली अब्बास जफर, जॅकी भगनानी, वाशू भगनानी, दीपशिखा देशमुख आणि हिमांशू किशन मेहरा हे आहेत.

# रिलीज आधीच 'पुष्पा २'ने कमावले १६० कोटी? ओटीटीसाठीची डील पक्की!




सध्या 'पुष्पा-२' या चित्रपटाचे चित्रीकरण जोमाने सुरू असून १५ ऑगस्ट रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच अल्लू अर्जुनच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'पुष्पा-२' मधील त्याचा टीझर लाँच करण्यात आला. या चित्रपटाबाबत कमालीची गोपनीयता बाळगण्यात आली आहे. या चित्रपटावर प्रचंड खर्च करण्यात येत असून जवळपास ५०० कोटींचे बजेट असल्याचे म्हटले जात आहे. 'पुष्पा २' बॉक्स ऑफिसवरील कमाईचे आकडे मोडणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच रिलीजपूर्वी 'पुष्पा २' ने १६० कोटींची कमाई केली असल्याचे म्हटले जात आहे.

**६ मिनिटाच्या सीनसाठी ६० कोटींचा खर्च**

सहा मिनिटांचा सीन शूट करण्यासाठी निर्मात्यांनी सुमारे ६० कोटी रुपये खर्च केले असून आणि सीन पूर्ण करण्यासाठी ३० दिवस लागले. सूत्रांच्या माहितीनुसार, या सीनमध्ये गंगाम्मा जत्रा आणि त्यातील संघर्ष दाखवण्यात आला आहे.

रिलीज आधीच कमाई

पुष्पा २ चे बजेट ५०० कोटी रुपये आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांनी जगभरातील संगीताचे हक्क आणि हिंदी सॅटेलाइट हक्क टी-सीरीजला ६० कोटी रुपयांना विकले आहेत. 'स्टार मां' या वाहिनीने तेलुगू सॅटेलाइट राइट्सही विकत घेतल्याचे बोलले जात आहे. मात्र, ही डील किती रुपयांमध्ये झाली, याची माहिती अद्याप समोर आली नाही.

**'पुष्पा २'च्या ओटीटी रिलीजची डील**

थिएटरमध्ये चित्रपट रिलीज होण्याआधीच ओटीटी रिलीजबाबत डील झाल्याची जोरात चर्चा सुरू आहे. पुष्पा-२ च्या निर्मात्यांनी ओटीटी रिलीजसाठी नेटफ्लिक्ससोबत करार केला असल्याची चर्चा सुरू आहे. ही डील १०० कोटींना झाली असल्याचे म्हटले जात आहे. मात्र, चित्रपटाच्या निर्मात्यांनी याबाबत अधिकृत कोणतीही माहिती दिली नाही.




# रणदीप तेरी मेरी यारी पुन्हा एकदा होणार दुनियादारी!




मराठी सिनेसृष्टीत अत्यंत गाजलेल्या सिनेमांपैकी 'दुनियादारी'हा एक सिनेमा आहे. दुनियादारी प्रदर्शित झाल्यानंतरच्या काळात त्याने तरुणाईला अक्षरश: वेड लावले होते. मराठीतील उत्तमोत्तम कलाकारांच्या अभिनयाने सजलेल्या या चित्रपटातील गाणी आणि संवाद आजही प्रेक्षकांच्या तितकेच लक्षात आहेत. दिग्या, श्रेया, शिरीन, मिनू या पात्रांना आणि त्यांच्यातील मैत्रीला प्रेक्षकांनी आपलंसे केले. आजही या पात्रांवरील मीम्स प्रचंड व्हायरल होत असतात. या सिनेमाच्या बाबतीत एक मोठी बातमी समोर आली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्री सई ताम्हणकर हिने दुनियादारीच्या सिक्वेलची घोषणा केली आहे.

सई ताम्हणकरने दुनियादारी चित्रपटात शिरीनचं पात्र साकारलं होतं. दिसायला सुंदर आणि धाडसी असलेल्या शिरीनने प्रेक्षकांची मने जिंकली. शिरीनच्या भूमिकेमुळे सईची लोकप्रियता आणखी वाढली. यानंतर तिने अनेक हिंदी, मराठी चित्रपट व वेबसिरीजमधून काम केले. पण शिरीन प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. सई ताम्हणकरने नुकतीच मॅशेबल इंडियाच्या द बॉम्बे जर्नी या शोमध्ये हजेरी लावली. यावेळी तिला शोचा होस्ट सिद्धार्थने तुम्ही सगळ्यांनी दुनियादारी सिनेमाच्या कास्टच्या रियुनियनचा विचार केला आहे का? असा प्रश्न विचारला. त्यावेळी तिने सिनेमाच्या सिक्वेलवर काम करत असल्याची गोष्ट रिव्हील केली.

सई म्हणाली, ''खरंतर आम्ही दुनियादारी सिनेमाच्या सिक्वेलवर काम करतोय. मी ही गोष्ट आधी कोणत्याही मुलाखतीमध्ये रिव्हील केली नाहीये. मी पहिल्यांदा या शोमध्ये बोलतेय. मी सिनेमाची स्क्रिप्ट वाचली आहे. ती खरंच खूप चांगली स्क्रिप्ट आहे. अजून आम्ही याविषयी घोषणा केलेली नाही आणि मला आशा आहे की आम्ही हा सिनेमा बनवू. आता आम्ही फक्त सुरुवातीच्या टप्प्यावर काम करतोय.''

# इफ्तार पार्टीसाठी बोलावून मुनव्वर फारुकीवर केला हल्ला?

## रेस्टॉरंटचा मालक आणि स्टाफने मारली अंडी

'बिग बॉस १७' विजेता मुनव्वर फारुकीसोबत चुकीची वागणूक केल्याचं प्रकरण समोर आलं आहे. जेव्हा इफ्तारी पार्टीसाठी मुनव्वर एका रेस्टॉरंटमध्ये गेला तेव्हा त्या रेस्टॉरंटचे मालक आणि तिथल्या स्टाफने त्याच्यावर अंडी फेकण्यास सुरुवात केली. त्यामुळे मुनव्वर संतापला. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. त्यात त्याच्या आजुबाजूला खूप गर्दी असल्याचे पाहायला मिळाले आहे. मुंबईच्या मोहम्मद अली रोडला हा प्रकार घडला आहे. रिपोर्ट्सनुसार, रेस्टॉरंटचे मालकानं मुनव्वरला इफ्तार पार्टीसाठी बोलावलं होतं. पण मुनव्वर दुसऱ्या कोणत्या रेस्टॉरंटमध्ये गेला. त्यामुळे रेस्टॉरंटच्या मालकाला राग आला आणि त्यानं त्याच्या पाच स्टाफ मेंबर्ससोबत मुनव्वरवर अंडी फ ेकण्यास सुरुवात केली. असं म्हटलं जातं की रेस्टॉरंटचे मालक आणि त्यांच्या स्फाटला पोलिसांनी अटक केली आहे.

या घटनेनंतर मिनार मस्जिद परिसरात गोंधळ उडाला होता. मुनव्वर देखील यावेळी संतापल्याचे पाहायला मिळत होते. आता मुनव्वरच्या बाजूने या प्रकरणात कोणतही स्टेटमेंट समोर आलेले नाही किंवा त्याने सोशल मीडियावर काही म्हटलेले नाही. मुनव्वर विषयी काही दिवसांपूर्वी एक बातमी समोर आली होती की एका हुक्काबारमध्ये पडलेल्या रेड दरम्यान, पोलिसांनी त्याला इतर सात लोकांसोबत अटक केली होती. चौकशी केल्यानंतर त्याला सोडण्यात आले. त्यानंतर एल्विश यादवची एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली होती. एल्विशने ट्विटरवर म्हटले होते की ''बिग बॉस विजेता ठरल्यानंतर सगळ्यांचा वाईट काळ सुरु होतो का?''

दरम्यान, बिग बॉसमध्ये आल्यानंतर मुनव्वरचं खासगी आयुष्य चर्चेत आलं होतं. मात्र, विजेता ठरल्यानंतर तो कायदेशीर अडचणीत अडकल्याचे दिसू लागले. तर दुसरीकडे एल्विश देखील विजेता ठरल्यानंतर तो देखील कायदेशीर कारवाईत अडकला आणि तुरुंगवास भोगून आता बाहेर आला आहे. त्यामुळे सोशल मीडियावर त्याची पोस्ट चर्चेत आहे. तर २०२१ मध्ये मुनव्वर इंदोरच्या सेंट्रल जेलमध्ये महिन्याभरापेक्षा जास्त काळ राहिला होता. त्यावर हिंदू कम्यूनिटीच्या भावना दुखावल्याचा आरोप होता.

# ''एक पप्पू मेरी जिंदगी में आए''; कंगना रणौतने उद्धव ठाकरेंना डिवचले




भाजपाने अभिनेत्री कंगना रणौतला हिमाचल प्रदेशमधील मंडी येथून उमेदवारी दिलीय. त्यामुळे कंगनाने आता जोरदार प्रचार सुरू केलाय. हिमाचल प्रदेशातील सत्ताधाऱ्यांवर कंगना जोरदार हल्लाबोल करताना दिसून येतील. एवढ्यावरच न थांबता कंगनाने हिमाचलमधून थेट मुंबईत बसलेल्या उद्धव ठाकरेंनाही टार्गेट केलेय.

उद्धव ठाकरेंचा 'पप्पू' असा उल्लख : ''मला आतापर्यंत खूप पप्पू भेटले आहेत. त्यातील एक पप्पू दिल्लीत आहेत. तर एक पप्पू मुंबईत बसले आहेत. उद्धव ठाकरे यांनी मला धमकावले, घाबरवले तसंच माझे मुंबईतील घर आणि कार्यालयही तोडले. तरीसुद्धा मी आज खंबीरपणे उभी आहे,'' असे म्हणत अभिनेत्री कंगनाने पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल करत त्यांचा 'पप्पू' असा उल्लेख केलाय.

कंगना आणि शिवसेना वाद : राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर अभिनेत्री कंगना राणौत विरुद्ध शिवसेना हा वाद देशभरात गाजला होता. कंगनाने मुंबई पोलिसांवर अविश्वास व्यक्त केल्यापासून ते तिने मुंबईला पीओके आणि नंतर पाकिस्तानाची उपमा देईपर्यंत हा वाद सुरू होता. मुंबईत येण्यास मला नकार देण्यासाठी मुंबई कुणाच्या बापाची नाही, असे खुले आव्हान कंगनाने शिवसेनेला दिले होते. तेव्हा मुंबई मराठी माणसाच्या बापाची आहे, अशा शब्दात संजय राऊतांनी प्रत्युत्तर दिले होते.

उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल : २०१९ मध्ये भाजपा-शिवसेनेने एकत्रित निवडणूक लढवली होती. मात्र, सत्ता स्थापन करताना शिवसेनेने अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाची मागणी केली. त्यास भाजपाने नकार दिल्याने शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत महाविकास आघाडी सरकार स्थापन केले होते. त्यावेळी उद्धव ठाकरे सरकारवर अभिनेत्री कंगना रनौतने सडकून टीका केली होती. मुंबईत सुरक्षित वाटत नसून हा एक पाकिस्तानचा भाग असल्याचे वादग्रस्त विधान केले होते.

कंगनाचे कार्यालय पाडले : हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदारसंघातून भाजपाने अभिनेत्री कंगना राणौतला तिकीट दिल्याने ती पुन्हा एकदा चर्चेत आली. यासोबतच साडेतीन वर्षापूर्वी बीएमसीने पाडलेल्या त्यांच्या मुंबईतील कार्यालयाबाबतही चर्चा सुरू झाली. हे संपूर्ण प्रकरण २०२० मधले आहे, त्यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यावेळी अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्या प्रकरणाची चौकशी सुरू होती. कंगनाने आरोप केला होता की, मुंबई पोलीस या प्रकरणात निष्काळजीपणा करत असून, बॉलिवूडमधील काही लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# अमिताभ यांच्या बालपणीची भूमिका करून झाला हिट, आज आहे यशस्वी व्यावसायिक



बॉलिवूडचे शहेनशाह अमिताभ बच्चन यांनी सिने कारकिर्दीत अनेक संस्मरणीय चित्रपट दिले. त्यांच्या चित्रपटात अमिताभ यांच्या बालपणीची भूमिका वेगवेगळ्या बालकलाकारांनी साकारली. 'कुली' या गाजलेल्या चित्रपटातही अमिताभ यांच्या बालपणातील भूमिका साकारणाऱ्या बालकलाकाराचे कौतुक झाले होते. हा बालकलाकार मास्टर रवी म्हणून प्रसिद्ध झाला. मात्र, त्यानंतर त्याची ओळख रवी वलेचा अशी निर्माण झाली. मास्टर रवीने अनेक सुपरहिट चित्रपटात काम केले आहे. सध्या हा मास्टर रवी करतो काय? असा प्रश्न अनेकांना पडला असेल.

**या चित्रपटात मास्टर रवीने केलंय काम?**

मास्टर रवीने १९७७ मध्ये सुपरहिट चित्रपट अमर अकबर अँथोनी या चित्रपटातही अमिताभ यांच्या बालपणीची भूमिका साकारली होती. विविध भाषेतील जवळपास ३०० चित्रपटांमध्ये काम करणारे रवी सध्या ४६ वर्षांचे आहेत. कुली, अमर अकबर अँथोनी, देश प्रेमी, शक्ती, मिस्टर नटवरलाल यासह गाजलेल्या अनेक चित्रपटात काम केले. रवीने ९० च्या दशकातील शांती या चित्रपटात काम केले आहे.

**सध्या रवी काय करतात?**

रवी सध्या हॉस्पिटिलीटी इंडस्ट्रीतील नावाजलेले नाव आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रवी हे मुलांना व्यक्तीमत्व विकास आणि अन्य कौशल्याचे प्रशिक्षण देतात. ग्लॅमरस सिनेइंडस्ट्रीपासून दूर राहून सध्या स्वत:चा व्यवसाय करत आहेत. रवी हे भारतातील आघाडीच्या खासगी बँकांना आपली सेवा प्रदान करत आहेत. मागील दोन दशकांपासून रवी या क्षेत्रात आपला दबदबा ठेवून आहेत. अहमदाबाद येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून त्यांनी हॉस्पिटिलीटी आणि फॅसिलिटीजमध्ये एमबीएची पदवी घेतली. त्यानंतर रवी या क्षेत्रात उतरले. सध्या आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून ते कोट्यवधी कमवत आहेत.

इतकंच नाही ज्या तरुणांना या हॉस्पिटिलीटी क्षेत्राचा हिस्सा व्हायचा आहे. त्यांनी रवी हे मार्गदर्शनही करतात.

# 'या' मराठमोळ्या अभिनेत्रीला रणवीर सिंहबरोबर करायचंय काम

## म्हणाली, भूमिका कशी......



'दुनियादारी', 'प्यारवाली लव्हस्टोरी' ते 'मिमी' आणि 'भक्षक'पर्यंतचा प्रवास करत सई ताम्हणकरने प्रेक्षकांचं मन जिंकलं. मराठी, हिंदी तसेच दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही तिने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. लवकरच सई इमरान हाश्मी आणि 'स्कॅम १९९२' फेम प्रतीक गांधीबरोबर 'ग्राउंड झिरो' या चित्रपटात झळकणार आहे. याव्यतिरिक्त सईने रणवीर सिंहबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा सईला विचारण्यात आलं की, तुला कोणत्या अभिनेत्याबरोबर आणि दिग्दर्शकाबरोबर काम करण्याची इच्छा आहे. यावर सई म्हणाली, रणवीर सिंह, देव पटेल, श्रीराम राघवन, अनुराग कश्यप आणि नागराज मंजुळे.

रणवीर सिंहच्या बहिणीची भूमिका मिळाली तर चालेल का? असं मुलाखतदाराने विचारताच सई ताम्हणकर नाही असं स्पष्टचं म्हणाली. मग वहिनीची भूमिका चालेलं का? असंही अभिनेत्रीला विचारण्यात आलं. यावर सई म्हणाली, बघा, भूमिका कशी आहे त्यावर अवलंबून आहे. वहिनी किंवा बहिणीची भूमिका असली तरी भूमिकेवर सगळं अवलंबून आहे.

'सौ. शशी देवधर' हा चित्रपट हिंदीमध्ये रिमेक व्हावा असंही सई या मुलाखतीदरम्यान म्हणाली. आयुष्यभर एकाच अभिनेत्याबरोबर काम करायचं असेल तर तो कोणता अभिनेता असेल? असा प्रश्न विचारताचं सईने ललित प्रभाकरचं नाव घेतलं.